आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । घाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १२२ । मंगळवार १० फेब्रुवारी २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे अधिक कडक व प्रभावी करावेत - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई :** महिलांवरील अत्याचार, छळ आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे अधिक प्रभावी आणि काटेकोरपणे अंमलात आणणे आवश्यक आहे, असे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाचे संरक्षण अधिकारी आणि पोलीस विभागाच्या भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांची एकत्रित जिल्हा व तालुका तर शहरात झोन निहाय समन्वय बैठका घेण्यात याव्यात अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली.

विधानभवनात आयोजित या उच्चस्तरीय बैठकीत कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अधिक परिणामकारक करण्याबाबत, शक्ती विधेयकाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील दिशा ठरविण्याबाबत तसेच अर्नेश कुमार विरुद्ध बिहार राज्य या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयातील सुधारणा याचिकेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बीएनएस प्रमाणे कार्यप्रणालीत ३५ अ ते आय या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी पोलीसांनी केल्यास पिडीतांना दिलासा मिळेल म्हणुन पोलीसांनी योग्य ती कार्यप्रणाली तयार करावी अशाही सुचना ऊपसभापती नीलम गोर्हे यांनी दिल्या.

# मिनी मंत्रालयावर महायुतीचाच झेंडा

## भाजप पून्हा राज्यात नंबर १; 'देवेंद्र-रवींद्र'च्या जोडीची निवडणूक विजयाची हॅट्रिक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील १२ जिल्हा परिषदेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात होते. १२ जिल्हा परिषदेच्या ७३१ तर आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी शनिवारी मतदान पार पडले. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्ह्यांचा समावेश आहे. नगरपरिषदा आणि महापालिकांच्या निवडणुका प्रमाणे जिल्हा परिषद निवडणुकीतही महायुतीने बाजी मारली.





राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकांचे निकाल जाहीर होताच भारतीय जनता पक्षाने पुन्हा एकदा सर्वाधिक जागा पटकावत आपली ताकद सिद्ध केली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये भाजपाने महायुतीतील सहकारी पक्षांपेक्षा तसेच महाविकास आघाडीपेक्षाही अधिक जागा जिंकून राज्यातील जनतेचा कौल आपल्याच बाजूने असल्याचे दाखवून दिले.

या विजयामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची जोडी सध्या राज्याच्या राजकारणातील 'जोडी नंबर वन' म्हणून अधिक ठळकपणे समोर आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सलग तिसऱ्यांदा सर्वाधिक जागा मिळवत अनोखी हॅटट्रिक साधली आहे.

**जिल्हा परिषद निवडणूक निकाल २०२६**

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | 225 |
| शिवसेना | 162 |
| शिवसेना ठाकरे | 46 |
| राष्ट्रवादी | 172 |
| राष्ट्रवादी (शप) | 21 |
| काँग्रेस | 55 |
| इतर | 33 |

नोव्हेंबर महिन्यात झालेल्या नगर परिषद निवडणुका, त्यानंतर जानेवारीत पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुका आणि आता फेब्रुवारीतील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका, या तिन्ही टप्प्यांमध्ये भाजपाने आघाडी घेतली. या यशामागे अचूक निवडणूक नियोजन, प्रभावी प्रचारयंत्रणा, स्थानिक आणि राज्य पातळीवरील समन्वय तसेच कार्यकर्त्यांशी थेट संवाद या घटकांचा मोठा वाटा असल्याचे पक्षाकडून सांगण्यात येत आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला रवींद्र चव्हाण यांच्या संघटनात्मक कौशल्याची जोड मिळाल्याने पक्षाची यंत्रणा अधिक सक्षम झाली. स्थानिक नेतृत्वाला शीर्षस्थ नेत्यांचा पाठिंबा मिळाल्याने अनेक ठिकाणी अपेक्षेपेक्षा अधिक आणि धक्कादायक विजय नोंदवता आले. रवींद्र चव्हाण यांना निवडणूक व्यवस्थापनात पारंगत नेता म्हणून ओळखले जाते. निवडणुकीत अत्यावश्यक असणारे साम दाम दंड भेद वापरताना विचारधारेच्या धाग्याने कार्यकर्त्यांना आणि मतदारांना जोडणारे असे त्यांचे नेतृत्त्व आहे. कार्यकर्त्यांमध्ये मिसळून काम करणारे आणि संघटन बळकट करण्यावर भर देणारे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांची प्रतिमा आहे.

दिल्ली आणि नागपूर या दोन्ही सत्ताकेंद्रांशी असलेले त्यांचे घनिष्ठ संबंध तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य या विजयात निर्णायक ठरल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

एकूणच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही टप्प्यांतील विजयामुळे भाजपाने राज्याच्या राजकारणात आपली पकड अधिक मजबूत केल्याचे स्पष्ट झाले आहे.

## जिल्हा परिषदांचा निकाल व पक्षनिहाय जिंकलेल्या जागा

**रायगड :**
एकूण जागा ५९
भाजप- १५
शिवसेना- २१
राष्ट्रवादी काँग्रेस- - १६
शिवसेना ठाकरे गट - ०५
काँग्रेस -२
शेकाप-०

**रत्नागिरी :**
एकूण जागा : ५६
भाजप- ०४
शिंदे शिवसेना - ४०
राष्ट्रवादी अजित पवार गट- ५
शिवसेना ठाकरे गट - ६
मनसे -१
काँग्रेस -
राष्ट्रवादी शरद पवार गट -०
अपक्ष - ०

**सिंधुदुर्ग :**
एकूण जागा- ५०
भाजप : २७
शिवसेना : १४
शिवसेना उबाठा: ०३
राष्ट्रवादी : ००
काँग्रेस : ००
अपक्ष :०६

**पुणे :**
एकुण जागा - ७३
भाजप -- १०
शिवसेना -- ४
राष्ट्रवादी -- ४८
शरद पवार गट -- १
ठाकरे गट -- ६
काँग्रेस -- ०
अपक्ष -- ०

**सातारा :**
एकुण जागा : ६५
भाजप - २३
शिवसेना - १३
राष्ट्रवादी - २२
ठाकरे गट- ०
काँग्रेस : १
इतर- २

**सांगली :**
एकूण जागा : ६१
भाजप - १६
राष्ट्रवादी अजित पवार - ६
काँग्रेस - ११
शिवसेना शिंदे गट - ०७
राष्ट्रवादी शरद पवार गट - १८
शिवसेना ठाकरे गट - ०१
जनसुराज्य - ०१
रयत क्रांती (सदाभाऊ खोत)- ०१

**कोल्हापूर :**
एकूण जागा - ६८
भाजप - १२
शिवसेना (शिंदे) - ९
राष्ट्रवादी - २०
काँग्रेस - १५
शिवसेना (ठाकरे) - १
जनसुराज्य - ६
स्वाभिमानी शेतकरी संघटना - १
शाहू आघाडी राजेंद्र पाटील यड्रावकर गट – ४

**सोलापूर :**
एकुण जागा : ६८
भाजप - ३६
शिवसेना - ५
राष्ट्रवादी - १०
राष्ट्रवादी शरद पवार - ७
शेकाप - ३
इतर- २

**छत्रपती संभाजीनगर :**
एकूण जागा ६३
भाजप : २३ आणि पुरस्कृत २
शिवसेना : २१ आणि पुरस्कृत १
शिवसेना UBT: ९
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट: ४
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट: १
काँग्रेस : १
अपक्ष : १

**परभणी :**
एकूण जागा- ५४
भाजप : २४
शिवसेना : ०५
शिवसेना ठाकरे गट: ०६
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट: १५
काँग्रेस : ०३
वंचित : ००
एमआयएम: ००
अपक्ष- १

**धाराशिव :**
एकूण जागा- ५५
भाजप : १९
शिवसेना शिंदे गट : १५
शिवसेना ठाकरे गट: ७
राष्ट्रवादी काँग्रेस : ६
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट: ०
काँग्रेस : ३
समाजवादी : १
एमआयएम: ००
अपक्ष : ४

**लातूर :**
एकूण जागा- ५९
भाजप : १८
काँग्रेस : २३
शिवसेना : ०१
शिवसेना UBT: ०१
राष्ट्रवादी अजित पवार : १२
राष्ट्रवादी शरद पवार : ०१
वंचित : ००
मनसे : ०१
अपक्ष : ०२

### महत्वाचे..



**अजितदादांच्या कार्याला जनतेने निकालातून अर्पण केली आदरांजली : तटकरे**

**मुंबई :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल म्हणजे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व आमचे नेते अजितदादा पवार यांच्या कार्याला आणि त्यांच्या अविरत परिश्रमांना जनतेने कृतज्ञतापूर्वक अर्पण केलेली आदरांजली आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

अजितदादांनी आयुष्यभर तळागाळातील माणसासाठी झटत विकासाला गती दिली. आजचा हा निकाल म्हणजे त्यांच्या विचारांवरील, त्यांच्या नेतृत्वावरील अढळ श्रद्धेची साक्ष आहे. या माध्यमातून दादांचा वारसा जपत अधिक जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे जनतेची सेवा करण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला आहे असेही सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.

### झापुक । zupuk

गुटखा तंबाखू वाले
भर रस्त्यात थुंकतात
मग होतात रोग
त्यांच्या थुंकीचा
इतर निर्व्यसन्याना
भोगावे लागतात भोग

नवनाथ कुताळ
९४२२२३१८२५

## शरद पवार यांची प्रकृती बिघडली

### उपचारासाठी रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर आली आहे. बारामतीतील गोविंदबाग येथून त्यांना उपचारासाठी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये सोमवारी (ता.९) दाखल करण्यात आले आहे.



गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांची तब्येत ठीक नसल्याचे सांगण्यात येत आहे. खोकला आणि कफाचा त्रास वाढल्याने त्यांना श्वास घेण्यास अडचण जाणवत होती. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना पुढील तपासणी व उपचारासाठी पुण्याकडे रवाना करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत कन्या खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

शरद पवार सकाळपासूनच गोविंदबागेत डॉक्टरांच्या पथकाच्या निरीक्षणाखाली होते. सुमारे तासभर वैद्यकीय **(पान ४ वर)**

# राज्यात ७० हजार पदांची लवकरच नोकरभरती

### नव्या पद्धतीने भरती होणार : मुख्यमंत्री फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे.

यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील पदांचा समावेश असणार आहे. भरती प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच सचिव उपस्थित होते. राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांकडे सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबवाव्यात याव्यात. मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता याला प्राधान्य असेल. राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सामान्य प्रशासन विभाग हा केवळ औपचारिक नाही, तर शासनाच्या संपूर्ण भरती प्रणालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य शासनाच्या विविध विभागात ७० हजार पदे भरल्यानंतर विभागाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शासनाने मांडलेले मनुष्यबळ व्यवस्थापन मॉडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरले. त्यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी इतर राज्यांनाही हे सुधारणा मॉडेल स्वीकारण्याचे निर्देश दिले. यामुळे महाराष्ट्र प्रशासन सुधारणा क्षेत्रात देशासाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी भर देण्याच्या सूचना केल्या.

पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाईन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरता येईल. यासाठी प्रत्येक विभागाने ब्लॉकचेन पद्धतीबरोबरच डीजीलॉकर प्रणालीत प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. त्याचबरोबर युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणे गरजेचे आहे. येणाऱ्या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्मचे नवे मॉडेल उभे राहील. यात प्रत्येक विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. यासाठी कोणत्याही विभागाने मागे राहता सर्वांनी एकत्र येऊन प्रशासन सुधारणा यशस्वी कराव्यात असेही श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## आरएसएसचे 'सांस्कृतिक राजकारण' देशाला विनाशाकडे नेणारे : ॲड. प्रकाश आंबेडकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) सध्या आपल्या सोयीनुसार भूमिका बदलत असून, ज्या गोष्टींना पूर्वी तुच्छ मानले जात होते, त्यांनाच आता 'कॅश इन' करण्याचे काम संघ करत आहे. आरएसएसचे चरित्र आता 'डी-बेस' आणि 'डी-डिफाइन' असे झाले आहे, अशी सडकून टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. यावेळी त्यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांना गोलवलकरांच्या विचारांवरून जाहीर आव्हान दिले.

ॲड. आंबेडकर म्हणाले की, मोहन भागवत आज सर्वसमावेशकतेच्या गप्पा मारत असले तरी, त्यांनी एक गोष्ट स्पष्ट करावी. एम.एस. गोलवलकर यांनी 'बंच ऑफ थॉट्स'मध्ये मांडलेला सांस्कृतिक रोडमॅप ते कंडेम (अमान्य) करतात का? मुंबईत मवाळ आणि उत्तर भारतात आक्रमक अशी दुटप्पी भूमिका संघ घेत आहे. उत्तर भारतात सामाजिक चळवळी रुजलेल्या नसल्याचा फायदा संघ उचलत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

यूजीसीच्या नव्या इक्विटी नियमावलीचा संदर्भ देत ॲड आंबेडकर म्हणाले, २०१२ मध्ये ही नियमावली केवळ एससी-एसटीसाठी होती, आता त्यात ओबीसींचा समावेश झाला आहे. मात्र, संघप्रेरित संघटना ओबीसींना यातून वगळण्यासाठी छुपे आंदोलन करत आहेत. ओबीसींवर होणाऱ्या अन्यायावर आरएसएसची चुप्पी ही चिंतेची बाब आहे. सावरकरांच्या मुद्द्यावर बोलताना **(पान ४ वर)**

# कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी ११ कोटी ८१ लाखांचा निधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**■ केंद्राचा ७ कोटी ९ लाख आणि राज्याचा ४ कोटी ७२.६७ लाख असा एकूण ११ कोटी ८१.६७ लाखांचा हिशोब पूर्ण करण्यात आला आहे. हा निधी थेट कृषी आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली विविध जिल्हास्तरीय प्रकल्पांसाठी वापरला जाणार आहे. तसेच, उर्वरित निधीपैकी ७ कोटी ९ लाख रुपये केंद्राचा आणि ४ कोटी ७२.६६ लाख रुपये राज्याचा असा मिळून ११ कोटी ८१.६६ लाख रुपयांचा निधी कृषी आयुक्त यांना दिला जाणार आहे.**

पुणे : राज्य सरकारने राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास योजनेसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षातील दुसऱ्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यास सोमवारी (दि. ९) मान्यता दिली. केंद्र आणि राज्याचा मिळून उर्वरित ११ कोटी ८१ लाख ६६ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या योजनेसाठी राज्यस्तरीय मंजुरी समितीने यापूर्वीच २८ कोटी २२ लाख रुपयांच्या वार्षिक कृती आराखड्याला मंजुरी दिली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १४ कोटी ११.६७ लाख रुपये आधीच खर्च करण्यात आले आहेत. आता दुसऱ्या हप्त्यात केंद्र सरकारकडून ८ कोटी ४६ लाख रुपये प्राप्त झाले असून, त्यात राज्याचा ५ कोटी ६४ लाख रुपयांचा वाटा मिळून एकूण १४ कोटी १० लाख रुपये राज्याच्या तिजोरीत जमा झाले आहेत.

या रकमेतील काही हिस्सा कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाकडे वळवण्यात आले असून, उर्वरित रक्कम थेट कोरडवाहू विकासासाठी वापरली जाणार आहे.

सर्वसाधारण प्रवर्गासाठी केंद्र सरकारकडून ५ कोटी ७१ लाख रुपये आणि राज्य सरकारकडून ३ कोटी ८०.६७ लाख रुपये मिळून एकूण ९ कोटी ५१.६७ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यात अनुसूचित जाती प्रवर्गासाठी केंद्राचा ७७ लाख आणि राज्याचा ५१.३३ लाख असा एकूण १ कोटी २८.३३ लाख रुपये निधी आहे. तर, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्राचा ६१ लाख आणि राज्याचा ४०.६७ लाख मिळून १ कोटी १.६७ लाख रुपये मंजूर झाले आहेत.



दरम्यान, या निधीचा मुख्य उद्देश कोरडवाहू भागातील पिकांची उत्पादनक्षमता वाढवणे हा आहे. तसेच, उपलब्ध असलेल्या मर्यादित जलस्त्रोतांचा आणि नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढवता येईल, यावर सरकारचा भर आहे. त्याचबरोबर, या योजनेमुळे कोरडवाहू क्षेत्रातील शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान, आवश्यक निविष्ठा आणि सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यास गती मिळणार आहे.

संपादकीय

# ग्रामीण महाराष्ट्रातील अभूतपूर्व हॅटट्रिक

राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या निकालांनी पुन्हा एकदा महायुतीच्या अजेयपणाची पुनरावृत्ती केली आहे. ७३१ जिल्हा परिषद जागांपैकी ५५२ जागा आणि १४६२ पंचायत समिती जागांपैकी १००० हून अधिक जागा जिंकून महायुतीने दणदणता डंका वाजवला. भाजपने २२५ जिल्हा परिषद जागांसह सर्वाधिक यश संपादन केले, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने १६५ आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने १६२ जागा मिळवल्या. महाविकास आघाडीला मात्र अवघ्या १२४ जागांवर (काँग्रेस ५५, उद्धव ठाकरे गट ४३, शरद पवार गट २६) समाधान मानावे लागले. हे यश महानगरपालिका-नगरपालिका निवडणुकांनंतरचे तिसरे मोठे यश आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपासून महायुती सलग तीन वेळा राज्यातील नंबर एकचा आघाडीचा पक्ष ठरला आहे.

या विजयाची कारणमीमांसा करणे आवश्यक आहे. प्रथम, महायुती सरकारची जनकेंद्रित धोरणे आणि विकासकामे ग्रामीण भागात खोलवर रुजली आहेत. 'माझी लाडकी बहिण', 'मुख्यमंत्री माझी लाडकी मुलगी', 'शेतकरी सम्मान', रस्तेबांधणी, पाणीपुरवठा, आरोग्य केंद्रे, शाळा-कॉलेज यांच्या माध्यमातून सामान्य माणूस थेट लाभार्थी झाला. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने विकासकामांच्या अंमलबजावणीत महायुतीचे नेतृत्व सरळ दिसले. मतदारांनी 'चांगले काम' यालाच मत दिले.

दुसरे, भाजपची संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांची मेहनत. गाव-गावात पोहोचलेला पक्ष, बूथ-स्तरीय संघटना, डिजिटल प्रचार, घरघरती भेटी- या सगळ्याचा परिणाम दिसला. पण फक्त भाजप नव्हे, तर युतीतील दोन्ही घटकांनीही आपापले बालेकिल्ले सांभाळले. शिंदे गटाने कोकण व ठाणे-पालघर भागात, अजित पवार गटाने पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात मजबूत पकड कायम ठेवली. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतरही राष्ट्रवादीने १६५ जागा जिंकणे ही मोठी कामगिरी आहे. युतीतील एकजूट, समन्वय आणि 'एकत्र राहून लढणे' हा सूत्रमंत्र यशस्वी ठरला.

तिसरे, महाविकास आघाडीची कमतरता. तीन पक्ष एकत्र असूनही त्यांना मुद्दा नव्हता, नेतृत्व नव्हते, संघटनशक्ती नव्हती. विधानसभा निवडणुकीनंतरही त्यांनी आत्मपरीक्षण केले नाही. फुटलेल्या पक्षांच्या नेत्यांमधील वैरभाव, स्थानिक पातळीवर एकमेकांविरुद्ध उमेदवार, जनतेशी नातं तुटणे- या सगळ्याचा परिणाम झाला. ग्रामीण मतदारांनी 'फुटलेल्या आघाडीला' विश्वास दिला नाही.

चौथे, मतदारांचा स्पष्ट संदेश. २०२४ पासून ते आजपर्यंत महायुतीला सलग तीन वेळा मिळालेला विश्वास हा 'स्थिर सरकार, विकास, सांस्कृतिक अभिमान' या त्रिसूत्रीवर आधारित आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या निकालाला 'चांगल्या प्रशासनाचा कौल' म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्याप्रमाणे, भाजप आता शहरी, उपनगरी आणि ग्रामीण भागातही नंबर एक ठरला आहे.

राज्याची राजकीय परिस्थिती आता पूर्णपणे बदलली आहे. महायुतीची पकड जिल्हा-तालुका-गाव पातळीपर्यंत मजबूत झाली आहे. आगामी महापालिका, जिल्हा बँका, सहकारी संस्थांच्या निवडणुका यातही हीच लाट दिसण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीला आता मोठे आत्मपरीक्षण करावे लागेल. अन्यथा ती आणखी कमकुवत होईल.

हा विजय फक्त राजकीय पक्षांचा नाही, तर महाराष्ट्रातील जनतेचा आहे. त्यांनी विकासाला प्राधान्य दिले, स्थिरतेला मते दिली, फुटीर प्रवृत्तींना नाकारले. महायुतीने या विश्वासाचे ऋण फेडण्यासाठी आणखी जोरदार काम करावे. कारण लोकशाहीत यश मिळवणे सोपे असते, पण ते टिकवणे कठीण असते. ग्रामीण महाराष्ट्राने दिलेला हा कौल महायुतीसाठी नव्या जबाबदारीची सुरुवात आहे.

# बेलापूर : परळी रेल्वे मार्गाच्या मंजुरीसाठी आमरण उपोषण सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा :** बेलापूर परळी रेल्वे मार्गाला केंद्र सरकारकडून तात्पुरती स्थगिती देण्यात आल्याच्या निषेधार्थ रेल्वे कृती समितीने आजपासून कुकाणा येथे ग्रामपंचायत प्रांगणात आमरण उपोषण सुरू केले आहे. या मार्गाला त्वरित मंजुरी मिळावी आणि काम सुरू व्हावे, या मागणीसाठी हे आंदोलन तीव्र करण्यात आले आहे.




रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष रितेश भंडारी यांनी उपोषणस्थळी सांगितले की, बेलापूर-परळी हा रेल्वे मार्ग केंद्र सरकारकडून मंजुरीसाठी प्रलंबित ठेवण्यात आला आहे. तोट्यात जाणाऱ्या अनेक रेल्वे मार्गांना मंजुरी देऊन या मार्गाला जाणीवपूर्वक आडकाठी आणली जात आहे. सर्वेक्षण पूर्ण होऊन जून २०२२ मध्ये अहवाल केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे सादर झाला असला तरी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी गेल्या तीन वर्षांपासून मंजुरी रोखून ठेवली आहे.

भंडारी यांनी पुढे आरोप केला की, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव, तसेच इतर मार्गांचा आरओआर (रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट) बेलापूर-परळी मार्गापेक्षा दुप्पट कमी असतानाही त्यांना मंजुरी मिळाली आणि काम प्रगतीपथावर आहे. या सर्व बाबी पुराव्यानिशी केंद्रीय रेल्वेमंत्री आणि रेल्वे बोर्डाच्या चेअरमन यांना कळविल्या असूनही जाणीवपूर्वक दिरंगाई केली जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ मध्ये समितीच्या आंदोलनादरम्यान व्यक्तिशः लक्ष घालण्याचे लेखी आश्वासन दिले होते. आठ वर्षे उलटूनही त्याची पूर्तता झाली नाही. यामुळे केंद्र आणि राज्य सरकारकडून जनतेची मोठी फसवणूक झाली आहे, असा आरोप भंडारी यांनी केला.

पूर्वीची आंदोलने आणि सध्याचे उपोषण या मार्गासाठी रेल्वे कृती समितीने यापूर्वी डिसेंबर २०१७ मध्ये सात दिवसांचे आमरण उपोषण, ऑगस्ट २०१८ मध्ये मुंबईत मंत्रालयात आत्मदहनाचा प्रयत्न आणि डिसेंबर २०१८ मध्ये पाच दिवसांचे उपोषण केले होते. तरीही केंद्र व राज्य सरकारकडून दिरंगाई सुरूच आहे.

उपोषणास रितेश भंडारी, रज्जाक इनामदार, सुरेश नरवणे बसले असून, गावकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला आहे. नेवासे मतदार संघाचे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी उपोषणास भेट देऊन जाहीर पाठिंबा व्यक्त केला. सोमवारी रेल्वे बोर्डाच्या गोपनीय शाखेचे सुनील कांबळे आणि सचिन नागरगोजे यांनी उपोषणार्थ्यांशी चर्चा केली. मात्र, प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत किंवा ठोस आश्वासन मिळेपर्यंत उपोषण सोडणार नसल्याचे कृती समितीने स्पष्ट केले.

हा १०४ वर्षांपासून प्रलंबित असलेला रेल्वे मार्ग मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा महत्त्वाचा प्रकल्प आहे. स्थानिक जनतेला रेल्वे सुविधेच्या प्रतीक्षेत वर्षानुवर्षे ताटकळत ठेवले जात असल्याने आंदोलन तीव्र होण्याची शक्यता आहे

## ब्रह्मप्राप्तीनंतरच भ्रमाची समाप्ती : प.पू. धीरज भोसले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : सांगली येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्राच्या ५९ व्या निरंकारी संत समागमानंतर निरंकारी सेवादल क्षमायाचना दिनानिमित्त श्रीरामपूर येथील संत निरंकारी सत्संग भवनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज व राजपिता रमित जी यांच्या कृपाशीर्वादाने पार पडलेल्या या कार्यक्रमात प.पू. धीरज भोसले यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी बोलताना धीरज भोसले म्हणाले की, परमपिता परमात्म्याची ओळख सद्गुरूंना शरण गेल्यानंतरच होते. ब्रह्मप्राप्ती झाल्याशिवाय मानवाच्या मनातील भ्रमाची समाप्ती होत नाही. सद्गुरु पूर्ण असून संसार अपूर्ण आहे. निंदा, मोह, माया व अहंकार मानवाला अधोगतीकडे नेणारे घटक असून या चक्रातून मुक्तीसाठी पूर्ण सद्गुरूंना शरण जाणे आवश्यक आहे. सेवा, सत्संग व नामस्मरणाच्या मार्गानेच जीवन खऱ्या अर्थाने सुखी व आनंदी होते, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रभर होणाऱ्या संत समागम व सत्संग कार्यक्रमांत निरंकारी सेवादलाचे युवक-युवती निस्वार्थ भावनेने लंगर, सुरक्षा, पार्किंग, पाणीपुरवठा, स्वच्छता आदी सेवा अखंडपणे बजावतात. सेवेदरम्यान कळत-नकळत झालेल्या चुका क्षमाविण्यासाठी क्षमायाचना दिन साजरा केला जातो.

सत्संगानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. याचबरोबर खिलारी वस्ती येथील साई मंदिरातही धीरज भोसले यांच्या उपस्थितीत निरंकारी सत्संग झाला. यावेळी अनेक भाविकांनी राजकुमार माटा यांच्याकडून ब्रह्मज्ञान प्राप्त केले. कार्यक्रमाचे आयोजन सेवादल युनिट क्रमांक २५५ च्या वतीने करण्यात आले.

# शास्ती माफीची घोषणा फोल
## कंपनीवर कारवाईची गरज : वाकचौरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** शास्ती माफीच्या संदर्भात सॉफ्टवेअर मधील डेटा उपलब्ध न झाल्याने संगमनेर शहरातील मालमत्ताधारक नागरिकांना शास्ती माफीचा लाभ मिळालेला नाही. सरकारी आदेश असूनही संबंधित अधिकारी व सॉफ्टवेअर कंपनीच्या बेजबाबदार आणि कामचुकारपणामुळे फटका नागरिकांना बसणार असेल तर त्यांना सरकारने जाब विचारून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, अशी मागणी नगर परिषदेचे माजी नगरसेवक कैलास वाकचौरे यांनी केली.

संगमनेर नगर परिषदेच्या हद्दीतील मालमत्ताधारक नागरिकांनी कराचा भरणा करण्यास सुरुवात केली आहे. शास्ती माफीचा जीआर सरकारने काढून सहा महिने झाले.मोठा गाजा वाजा करीत श्रेयवादाचे कलगीतुरा नागरिकांनी अनुभवला होता. नगर परिषदेचे कर्मचारी शास्तीसह कराचे पैसे भरून घेत होते, नागरिकांनी विचारले शास्ती माफ असताना तुम्ही माफ झालेली जास्त वाढीव रक्कम का भरून घेतात ?', तर त्यांच्याकडून सांगण्यात आले 'अजून सरकारचे सॉफ्टवेअर अपडेट झाले नाही. आम्हाला काहीच आदेश नाही.' त्यामुळे नागरिकांनी नाइलाजाने शास्ती दंड भरला.

जर सरकारी आदेश असताना संबंधित अधिकारी व सॉफ्टवेअर कंपनीच्या बेजबाबदार व कामचुकार पणाचा फटका नागरिकांना बसणार असेल तरम त्यांना सरकार जाब विचारून कारवाई केली पाहिजे, संबंधितांनी हे कृत्य मुद्दाम केले की, कुणाच्या आदेशाने केले.सॉफ्टवेअर कंपनीची चूक असेल तर कंपनीला दंड करून लोकांनी भरलेली शास्ती दंड परत मिळावी. नागरिकांनी घरपट्टी उशिरा भरली तर नगर परिषद नागरिकांना दंड व्याज लावत असेल.

त्यामुळे नगर परिषद अधिकारी व सॉफ्टवेअर कंपनीला दंड व्याज लावलाच पाहिजे. या संदर्भाने जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करीत पाठपुरावा करणार आहे. या संदर्भाने नागरिकांची जनआंदोलन उभारणीची तयारी असल्याचे वाकचौरे यांनी यावेळी सांगितले.

# आजपासून राहुरीत विना हेल्मेट दुचाकीस्वारांवर कारवाई होणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** नगर मनमाड महामार्गावरील अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी अपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांच्या आदेशानुसार आज पासून राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांवर पोलीस कारवाई करणार आहेत.

> राहुरी शहरातून सुरू असलेल्या नगर मनमाड महामार्गाच्या कामामुळे अनेक प्रवासी त्यांची वाहने राँग साईडने घालून वाहतूक ठप्प करीत असल्याने राहुरी पोलिसांनी दिनांक १ जानेवारी २०२६ पासून ते ८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ८२० वाहनांवर राहुरी पोलिसांनी कारवाई करून त्यांच्याकडून सुमारे ५,६५,६००/- रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. त्यामुळे नागरिकांनी आपली वाहने एकेरी लेनमध्ये चालवून प्रशासनाला सहकार्य करावे अन्यथा कारवाई अटळ आहे.
>
> **संजय ठेंगे**
> **पोलीस निरीक्षक राहुरी**

यासंदर्भात राहुरी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सन २०२४ मध्ये ५७ सन २०२५ मध्ये ५८ अपघात होऊन या अपघातांमध्ये निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. यामध्ये मृत्युमुखी पडलेले बरेचसे नागरिक हे दुचाकी चालवताना आणि हेल्मेट न वापरणारे होते. याची दखल घेऊन अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी विना हेल्मेट दुचाकीवर प्रवास करणारे प्रवाशांवर अपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांचे सुचनेनुसार व पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार आज दिनांक १०/०२/२०२६ पासून दूचाकी धारकांनी विना हेल्मेट वाहन चालविल्यास त्यांच्यावर पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे.

तरी सर्व दुचाकी धारकांना पोलिसांकडून आवाहन करण्यात येत आहे की नगर मनमाड मार्गावरून प्रवास करताना प्रवाशांनी हेलमेट चा वापर करून आपली स्वतः ची काळजी घ्यावी.त्याबरोबर काल दिनांक ९ फेब्रुवारी रोजी राँग साईडने वाहन घालणाऱ्या आणि रंगीत काचा असणाऱ्या ४० वाहनांवर कारवाई करून त्यांच्याकडून ३०,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.सध्या अहिल्यानगर ते मनमाड जाणाऱ्या महामार्गाचे काम चालू असून राहुरी शहरांमध्ये एकेरी वाहतूक करण्यात आली आहे तरी सदर वाहतूक ही संथ गतीने चालू असते तरी गर्दीमध्ये राँग साईडने आपली वाहने घेऊन येऊन सदरची वाहतूक ही जाम केली जाते अशा वाहन चालकावर काल दि.९/२/२०२६ रोजी राँग साईडने वाहन घालणाऱ्या ४० वाहनावर कारवाई करून त्यांच्याकडून ३०,००० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. त्यापैकी काळ्या काचा, रंगीत काचा वाहन चालक च्या ४ वाहनावर कारवाई करून २००० रुपये दंड वसूल करण्यात आला

# तेजस्विनी फाउंडेशनचा 'वस्त्रोत्सव : द एथनिक फॅशन शो' दिमाखात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** :महिलांच्या सर्जनशीलतेला, भारतीय पारंपरिक वस्त्रसंस्कृतीला आणि सांस्कृतिक वारशाला व्यासपीठ देण्यासाठी तेजस्विनी फाउंडेशन, श्रीरामपूर यांच्या वतीने 'वस्त्रोत्सव – द एथनिक फॅशन शो' या कार्यक्रमाचे आयोजन खा. गोविंदराव आदिक सभागृहात करण्यात आले. या कार्यक्रमास महिला सहभागींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



संजीवनी अकॅडमीच्या कार्यकारी संचालक मनाली कोल्हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी नीती ओगले, इंदुताई डावखर, राजश्री ससाणे, दीपाली ससाणे, मंजुश्री मुरकुटे, अनुराधा आदिक, स्नेहल खोरे तसेच तेजस्विनी फाउंडेशनच्या अध्यक्षा कल्पना बनकर, सचिव प्रा. रूपाली उंडे-बनकर, खजिनदार डॉ. स्वाती चव्हाण व सदस्या निशाताई निर्मळ उपस्थित होत्या.

स्पर्धेचे परीक्षण पल्लवी खर्डे व अनुराधा सोनवणे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. रूपाली उंडे यांनी केले, तर आभार डॉ. स्वाती चव्हाण यांनी मानले. सूत्रसंचालन राजलक्ष्मी चव्हाण व त्रिशा बनकर यांनी केले.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पैठणी (इनरव्हील क्लब), द्वितीय बनारसी साडी (देसी नारी ग्रुप) व तृतीय कसावू साडी (जागृती महिला मंडळ) यांना मिळाले. तसेच पटोला साडी, मारवाडी पोशाख, बेस्ट एथनिक दिवा, बेस्ट ड्रेप, बेस्ट रॅम्प वॉक, ब्युटीफुल आयज व फोटोजनिक फेस आदी विविध गटांत पारितोषिके प्रदान करण्यात आली.

# संजीवनीच्या पाच विद्यार्थ्यांना डेलॉईट कंपनीत नोकरीची संधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगांव :** जगभरातील कंपन्यात स्वतःचे वेगळे स्थान असलेल्या डेलॉईट या कंपनीने संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या पाच विद्यार्थ्यांना आकर्षक वेतन देऊन नोकरीची संधी दिली. या कंपनीचे मुख्यालय लंडन येथे आहे. संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग प्लेसमेंट विभागाच्या पुढाकारामुळे या विद्यार्थ्यांना हि संधी मिळाली. त्यात संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या कॉम्प्युटर इंजिनिअरींग, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या अंतिम सत्राची परीक्षा देणा-या पाच विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रयत्नातून या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले . या कंपनीच्या मानव संसाधन विभागाच्या प्रतिनिधिंनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. संजीवनीच्या कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या सार्थक सतीश चौधरी,आदित्य अनिल पानगव्हाणे, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभागाच्या उत्कर्ष सुनिल जाधव, चेतन बाबासाहेब वाकळे व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या जान्हवी आनंद बारबिंड यांची नोकरीसाठी निवड करण्यात आली.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग व संबधित अभियांत्रिकी शाखेचा विभाग यांच्या परस्पर पुरक समन्वयातुन विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्यात आणि चांगल्या वेतनाच्या नोकरीच्या संधी मिळत आहेत. उद्योग जगताला हवे असलेले शिक्षण देण्यावर भर दिला जात असल्याचा हा परिणाम आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागा मार्फत विद्यार्थ्यांकडून मुलाखतींचा सराव करून घेतला जातो. त्यातून त्यांच्यात नवा आत्मविश्वास निर्माण होतो.

## मांजरसुंबा येथे कलशरोहण सोहळ्यानिमित्त नियोजन बैठक

**अहिल्यानगर :** तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या मांजरसुंबा येथील श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड देवस्थानच्या वतीने येत्या ७ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या कलशरोहण व लोकअर्पण सोहळ्यानिमित्त धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांच्या नियोजनासाठी बैठक पार पडली. देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शंकरराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या वेळी कलशरोहण सोहळ्यापूर्वी भव्य पालखी मिरवणूक, नवनाथ पारायण व कीर्तन सोहळ्यांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड, मांजरसुंबा येथून कलशरोहण पालखी मिरवणुकीचा शुभारंभ होणार आहे. या मिरवणुकीत टाळ-मृदुंगाच्या गजरात नाथभक्त, वारकरी, महिला भक्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. पालखी मिरवणूक विविध गावांत मुक्काम करत २ मार्च रोजी नगर शहरमार्गे गोरक्षनाथ गडावर दाखल होणार आहे. तसेच गडावर सकाळी ८ ते १२ या वेळेत नवनाथ पारायण होणार असून इच्छुक भक्तांनी देवस्थान कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कर्मचाऱ्यांनी नोकरीच्या ठिकाणी वास्तव्य करावे : शालिनीताई सुखदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ तसेच सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम सन १९८१ तसेच राज्य शासनाने वेळोवेळी काढलेल्या मार्गदर्शक परिपत्रकानुसार नागरिकांची कामे तत्परतेने होण्यासाठी नगरपंचायतच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नोकरीच्या ठिकाणी वास्तव्य करावे अशी मागणी उपनगराध्यक्षा शालिनीताई संजय सुखदान यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले की, नेवासा शहराची सध्याची परिस्थिती पाहता नेवासा शहरात सध्या पाण्याचा प्रश्न तसेच सार्वजनिक स्वच्छता प्रश्न गंभीर झालेला आहे. शहरात सार्वजनिक स्वच्छता नसल्याने अनेक गंभीर आजाराला निमंत्रण मिळत आहे, त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

वास्तविक पाहता आपल्या कार्यालयातील आपण स्वतः आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांनी नोकरीच्या ठिकाणी राहणे अत्यंत आवश्यक आहे. तो आपल्या कर्तव्य परायणतेचा भाग आहे. याआधी देखील अधिकारी व कर्मचारी वेळेवर उपस्थित नसल्याने व ते स्थानिक ठिकाणी वास्तव्यास नसल्याने गंभीर प्रकार घडलेले आहे.

आपण नोकरीच्या ठिकाणी वास्तव्यास असणे कायद्याने बंधनकारक आहे आपल्याला व आपले इतर अधिकारी यांना आम्ही वेळोवेळी वरील बाबीची जाणीव करून देऊन या नेवासा शहरात वास्तव्य करावेजेणेकरून नेवासा शहराचे प्रश्नांची आपल्याला जाण निर्माण होईल तसेच नगरपंचायतीमार्फत नागरिकांचे प्रश्न वेळेत सुटतील.

याबाबत अनेकदा तोंडी विनंती केली आहे परंतु त्याबाबत आपल्याकडून अथवा आपल्या अधिकाऱ्यांकडून कुठलीही सुधारणा झाल्याचे तसेच आपण नेवासा शहरात वास्तव्यास आलेले नाही ही फार मोठी गंभीर बाब आहे. त्यामुळे आपणास आपले सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना नेहमी शहरातच वास्तव्यास यावे अन्यथा वर नमूद केलेले नियमाप्रमाणे याबाबत योग्य त्या ठिकाणी कायदेशीर दाद मागण्यात येईल असा ईशारा निवेदनात देण्यात आला आहे. सदरच्या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री,नगर विकास मंत्री,जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना पाठविण्यात आलेल्या आहे.

## दिघी - खैरी निमगाव पोट चारीचे काँक्रीटीकरण काम थांबवा
### शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** वडाळा पाटबंधारे खात्याकडून दिघी ते निमगाव खैरी पोट चारीचे काँक्रीटीकरण करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.पण या कामामुळे परिसरातील शेती व शेतकरी व्यवसाय धोक्यात येणार आहे. त्यामुळे या चारीचे काँक्रीटीकरण काम थांबवा अन्यथा याविरोधात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.



पाटबंधारे खात्याकडून दिघी ते निमगाव खैरी पोट चारीचे काँक्रीटीकरण केल्यास चारीच्या पाण्याचे झिरपणे (परक्युलेशन) कायमचे बंद होऊन लगतच्या शेती मधील विहिरी, बोरचे पाण्याचे प्रमाण कायमचे बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे.या चारी लगतच्या विहिरी,बोर आटून जाण्याच्या व त्यामुळे तेथील शेती व शेतकरी उद्ध्वस्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे दिघी – निमगाव खैरी चारीचे बाजूने असलेले परिसरातील शेती व शेतकऱ्यांमध्ये या काँक्रीटीकरण कामामुळे मोठा रोष, संताप निर्माण झाला आहे.

तरी पाट बंधारे खात्याने या चारीचे काँक्रीटीकरण काम तत्काळ थांबवावे अशी मागणी या चारीचे लाभधारक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.या पूर्वी असेच काँक्रीटीकरण काम वांगी-खिर्डी चारीवर सुरू करण्यात आले होते पण तेथील लाभधारक शेतकऱ्याकडून प्रचंड विरोध झाल्यामुळे ते काम बंद करण्यात आले आहे.त्याच धर्तीवर दिघी – निमगाव खैरी चारीचे काँक्रीटीकरणचे काम थांबवून या शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी सतिश जाधव, राधाकीसन डांगे, प्रशांत गायकवाड, प्रल्हाद गायकवाड,गोरख डांगे,अमोल गायकवाड,जालींदर वाणी इत्यादींकडुन होत आहे.सदर चारीचे काँक्रीटीकरण काम त्वरित बंद न केल्यास या चारीचे लाभधारक शेतकऱ्याकडून मोठ्या आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# अल्पवयीन मुलास जीवे ठार मारण्याची धमकी
### पाच जणांवर गुन्हा दाखल, श्रीरामपूर शहरातील घटना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील म्हाडा कॉलनी परिसरात बंदुकीने तुला मारुनच टाकतो, तुला जिवंत सोडणार नाही, असे म्हणून शिवीगाळ करीत अल्पवयीन मुलास जीवे ठार मारण्याची धमकी दिली. श्रीरामपूर शहरातील म्हाडा कॉलनी परिसरात घडला. याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास अल्पवयीन मुलगा म्हाडा कॉलनीच्या खाली मोकळ्या जागेत अल्पवयीन मुलाच्या मोबाईलवर गेम खेळत बसलो होतो. तेव्हा तेथे दोन मोटारसायकलवर अल्पेश, शुभम, करण, सोनु व त्यांच्यासोबत एक अनोळखी इसम नाव माहित नाही हे तेथे आले. त्यानंतर त्यांच्यातील अल्पेश हा अल्पवयीन मुलाला म्हणाला की, ''तु म्हाडा मधील मुलांसोबत का राहातो, बंदुकीने तुला मारुनच टाकतो, तुला जिवंत सोडणार नाही,'' असे म्हणून मला वाईट-वाईट शिवीगाळ केली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तेव्हा मी खुप घाबरल्याने मी लगेच तेथून पळून गेलो. त्यानंतर ते सर्वजण त्यांच्याकडील मोटारसायकलवर तेथून निघून गेला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलाने फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी पाच जणांनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# कृषी पदवीधरांनी नोकरी करणारे नाही तर नोकरी देणारे व्हावे : शैलेश देशमुख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : कृषी क्षेत्रातील पदवीधरांनी व्यावसायिक ज्ञान घेऊन शेतकऱ्यांना विविध सेवा सुविधा देण्याबरोबरच शेतकऱ्यांचे सल्लागार व्हावे आणि या माध्यमातून आपला आणि आपल्या शेतकऱ्यांचा विकास करावा आणि हा विकास करत असताना नोकरी करणारे नाही तर नोकरी देणारे उद्योजक घडावेत यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सुरू झालेले ग्री क्लिनिक्स अँड. ग्री बिजनेसचे हे प्रशिक्षण कृषी पदवीधरांसाठी महत्त्वपूर्ण ठरेल असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले.




कृषी विज्ञान केंद्र आणि 'मॅनेज' हैदराबाद यांच्या वतीने आयोजित ४५ दिवसीय निवासी ग्री-क्लिनिक आणि ग्री-बिझनेस प्रशिक्षणाचा शुभारंभ शैलेश देशमुख बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तम कदम, पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या प्रशिक्षणांच्या शुभारंभ प्रसंगी केंद्रातील शास्त्रज्ञ मृद विज्ञान विभागाचे शांताराम सोनवणे, उद्यान विद्या विभागाचे डॉ. विलास घुले, पशु विज्ञान विभागाचे डॉ. विठ्ठल विखे, कृषी विस्तार विभागाच्या डॉ. प्रियंका खर्डे, गृह विज्ञान विभागाच्या सज्जला लांडगे, संगणक विभागाचे कैलास लोंढे आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. शैलेश देशमुख यांनी प्रशिक्षणार्थींना आतापर्यंत केंद्रामार्फत घेतलेल्या बॅचेस मधून घडलेले यशस्वी उद्योजक तसेच या कोर्स चे महत्व, तसेच ते म्हणाले की, आजच्या काळात कृषी पदवीधरांनी नोकरीच्या मागे न लागता 'नोकरी देणारे' बनले पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले. कृषी क्षेत्राच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारत घडावा यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून आज पर्यंत देण्यात आलेल्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अनेकांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपले योगदान देत शेतकऱ्यांना विविध सेवा सुविधा दिल्या आहेत. या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना देखील शेतकऱ्यांपर्यंत सक्षमरित्या पोहोचत आहेत. या योजनेअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांना कृषी उद्योगासाठी २० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज आणि ३६% ते ४४% पर्यंत अनुदान मिळण्याची संधी आहे.

या ४५ दिवसांच्या कालावधीत प्रशिक्षणार्थींना शेतीपूरक व्यवसाय, उद्योजकीय कौशल्य, मार्केटिंग कौशल्य, प्रकल्प अहवाल तयार करणे, बँकिंग प्रक्रिया आणि आधुनिक तंत्रज्ञान यावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. प्रियंका खर्डे यांनी केले.

## द•ख•ल

### अखंड हरिनाम सप्ताहास धर्म ध्वजारोहणाने प्रारंभ



**बालाजी देडगाव** : येथे महाशिवरात्री यात्रा उत्सवानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची धर्म ध्वजारोहणाने उत्साहात प्रारंभ करण्यात आला. येथील महादेव मंदिर देवस्थान येथे आयोजित या सोहळ्यात हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या हस्ते, मेजर रवींद्र देवकाते यांच्या अध्यक्षतेखाली व हभप सुखदेव महाराज मुंगसे यांच्या प्रमुख उपस्थितीत धर्म ध्वजारोहण पार पडले. यावेळी सपना वेलनेस परिवाराचे डॉ. अर्जून सुसे, हभप सदाशिव महाराज पुंड, हभप बाबासाहेब महाराज वांढेकर, माजी सभापती कारभारी चेडे, सरपंच चंद्रकांत मुंगसे, माजी चेअरमन बाबासाहेब मुंगसे, मार्केट कमिटीचे माजी सभापती कडूभाऊ तांबे, ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक जनार्धन कदम, उपसरपंच बाळासाहेब मुंगसे, माजी चेअरमन कारभारी मुंगसे, भाऊसाहेब मुंगसे, विवेक औटी, दादासाहेब वाहूरवाघ, जनाभाऊ मुंगसे, भाजपचे आकाश चेडे, बाळूशेठ चोपडा, संदीप तांबे आदी उपस्थित होते.

### मुस्लिम वधू-वर मेळाव्याचे नगरमध्ये आयोजन

अहिल्यानगर : नगर शहरात विवाह इच्छुक कुटुंबांसाठी एक महत्त्वाची संधी उपलब्ध होत असून गुरुवार दि. १२ फेब्रुवारी रोजी, सकाळी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत सर्जेपुरा येथील रहेमत सुलतान हॉलमध्ये एकदिवसीय भव्य मुस्लिम वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रहमत सुलतान मॅरेज ब्युरोच्या वतीने हा मेळावा होत असून तो सर्व मुस्लिम बिरादरीसाठी पूर्णतः मोफत असल्याची माहिति आरिफ सय्यद यांनी दिली. या मेळाव्यात संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या विवाहयोग्य मुला-मुलींचे फोटो व बायोडाटा पाहण्याची सुविधा उपलब्ध असेल. डॉक्टर, इंजिनियर, सुशिक्षित तसेच कमी शिक्षित, अविवाहित, घटस्फोटित, विधवा-विधुर अशा सर्व प्रकारच्या रिश्त्यांची माहिती एका ठिकाणी मिळणार आहे. पालकांनी मुला-मुलींचे फोटो व बायोडाटा सोबत आणणे आवश्यक आहे.

## कोपरगावच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाचे पाठबळ : मुख्यमंत्री फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे आणि युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी कोपरगाव नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष पराग संधान तसेच सर्व नगरसेवकांसह सदिच्छा भेट घेतली. येवला येथे झालेल्या या भेटीदरम्यान राज्यभर भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.



यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचीही उपस्थिती होती. या भेटीत कोपरगाव शहराच्या सर्वांगीण विकासाबाबत सविस्तर चर्चा झाली. नगरपरिषद निवडणुकीदरम्यान जनतेसमोर मांडलेल्या 'विश्वासनामा'तील विकासकामे प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्य शासनाकडून सकारात्मक पाठबळ मिळेल, अशी भूमिका घेतल्याबद्दल मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानण्यात आले. पाणीपुरवठा, रस्ते विकास, ड्रेनेज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण तसेच शहर सौंदर्यीकरणासाठी आवश्यक योजनांबाबत मागण्या मांडण्यात आल्या.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत कोपरगावच्या विकासासाठी शासनाचे संपूर्ण सहकार्य राहील, असे आश्वासन दिले.

## मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक : डॉ. अनुराधा गोरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, त्रिमूर्तीनगर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळांतर्गत 'निर्भय कन्या अभियान' अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी आत्मसंरक्षण, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. अनुराधा गोरे यांनी केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात मार्गदर्शक डॉ. स्नेहल आरसुळे यांनी विद्यार्थिनींना जीवनात स्पष्ट ध्येय निश्चित करून शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याचे महत्त्व पटवून दिले. मोबाईलचा मर्यादित वापर, वेळेचे योग्य नियोजन, स्वयंशिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांद्वारे यश साध्य करता येते, असे त्यांनी सांगितले. सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि ठोस उद्दिष्टे यांमुळे यशाचा मार्ग सुकर होतो, असे नमूद करत स्त्रियांच्या सुरक्षिततेशी संबंधित कायदे व हक्कांविषयीही त्यांनी माहिती दिली. दुसऱ्या सत्रात प्राचार्य डॉ. संध्या भंगाळे यांनी 'मानसिक आरोग्य व्यवस्थापन व स्त्रियांचे स्वास्थ्य' या विषयावर मार्गदर्शन केले.

मानसिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास व जागरूकता आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थिनींनी वैयक्तिक सुरक्षा, आर्थिक नियोजन व मानसिक आरोग्याशी संबंधित प्रश्न विचारले. यावेळी प्रा. नायडू यांनी कराटे प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आत्मसंरक्षणाच्या मूलभूत तंत्रांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. अनुराधा गोरे यांनी 'निर्भय कन्या अभियान'चे महत्त्व स्पष्ट करत शिक्षणासोबत आत्मसंरक्षण, आरोग्यजागरूकता आणि कायदेशीर हक्कांची माहिती असणे आवश्यक असल्याचे सांगितले. आत्मविश्वास, स्वयंशिस्त व सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावरच मुली जीवनात यशस्वी होऊ शकतात, असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाला विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. निकिता बर्गे, प्रा. अमृता देवकर, प्रा. योगिता गायकवाड, प्रा. अश्विनी औटी, प्रा. दिपाली भोसले, प्रा. नूतन वंजारे, प्रा. गायत्री ढाकिफळे, प्रा. गीता जाधव आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन पूजा डोईफोडे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. निकिता बर्गे यांनी, तर आभार प्रा. अश्विनी औटी यांनी मानले. कार्यशाळेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी उपोषण सुरु

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या विविध मागण्यांसाठी बहुजन दिव्यांग क्रांती सेनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष अमित जेधे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.९ फेब्रुवारी रोजी नेवासा नगरपंचायत चौकात उपोषण सुरू करण्यात आले आहे. नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगाचे शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमाकूल करुन हक्काचे उतारे देण्यात यावे, दिव्यांगाना तात्काळ पंतप्रधान आवास योजनेचा लाभ मिळावा, नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगांना ५ टक्के निधीचा लाभ मिळावा तसेच सदर निधीबाबत दरवर्षी माहिती देण्यात यावी, नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगाची तात्काळ वारस नोंद लावण्यात यावी व उतारा मिळावा.

नेवासा नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगाला गाळे मिळावे तसेच शासकीय जागेवर व्यावसायासाठी जागा मिळावी, नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगाची पाणीपट्टी घरपट्टी माफ करावी,नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगांना युडीआयडी कार्डसाठी शिबीराचे नियोजन करण्यात यावे, नगरविकास विभागाकडून दिव्यांग कल्याण निधी उपलब्ध व्हाव्यात अशा आमच्या मागण्या असल्याचे बहुजन दिव्यांग क्रांती सेनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष अमित जेधे यांनी यावेळी बोलतांना सांगितले.उपोषणाचे नेतृत्व बहुजन दिव्यांग क्रांती सेनेचे संस्थापक अमित जेधे हे करत असून त्यांच्या समवेत दिव्यांग क्रांती सेनेचे उपाध्यक्ष गणीभाई पठाण,सदस्य रहीम शेख,आरिफ पठाण,सुलेमान सय्यद,अर्जुन खरात, करीम पिंजारी,गुलाब शेख,अरुण भाकरे,अज्जूद्दीन शेख, पुंजाराम म्हैसमाळे,हालीमा पठाण,नजमा शेख,बाबासाहेब जाधव,अनिल कराडे,श्रीपाद जाधव,सुनंदा लोळगे, रुकसाना शेख,जब्बार पठाण,अशोक पाटोळे,विजय दाणे शाईबाज शेख,मुबारक शेख,मुकुंद काळे यांनी सहभाग नोंदवला आहे. **(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**




## मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींना 'प्रशासकीय ऑक्सिजन'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील मुदत संपलेल्या तब्बल ४४ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामपंचायतींचा कारभार नियमानुसार, सुरळीत व पारदर्शकपणे चालावा, विकासकामांना गती मिळावी आणि प्रशासकीय कामकाजात कोणताही खंड पडू नये, या उद्देशाने गटविकास अधिकारी सुरेश तायडे यांनी प्रशासक नियुक्तीचे आदेश जारी केले आहेत. तालुक्यातील राजकीयदृष्ट्या संवेदनशील व कायम चर्चेत असलेल्या धानोरे आणि सात्रळ या ग्रामपंचायतींसह ४४ गावांचा कारभार आता प्रशासकांच्या हाती गेला आहे. निवडणुका होईपर्यंत या ग्रामपंचायतींची सूत्रे संबंधित अधिकाऱ्यांकडे राहणार असल्याने गावपातळीवरील निर्णयप्रक्रिया लोकप्रतिनिधींकडून प्रशासकीय यंत्रणेकडे गेल्याचे स्पष्ट झाले आहे.

विशेष म्हणजे, धानोरे व सात्रळ या दोन महत्त्वाच्या ग्रामपंचायतींसाठी सामाजिक बांधकाम विभागाचे उपअभियंता घोरपडे एस. एस. यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे या गावांतील प्रलंबित विकासकामांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमुळे अनेक ठिकाणी निर्णयप्रक्रिया रखडली होती. विकासकामांची गती मंदावली होती. नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी सक्षम यंत्रणा नसल्याची तक्रार पुढे येत होती. अशा परिस्थितीत शासनाने प्रशासक नेमण्याचा निर्णय घेतल्याने प्रशासनाला एकप्रकारे 'ऑक्सिजन' मिळाल्या सारखे आहे.

धानोरे व सात्रळ ही गावे ग्राम राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेली आहेत. येथे निवडणुका नेहमीच चुरशीच्या झाल्या आहेत. त्यामुळे या गावांवर प्रशासक नेमल्याने स्थानिक राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. लोकप्रतिनिधींऐवजी आता अधिकाऱ्यांच्या निर्णयांवर ग्रामकारभार अवलंबून राहणार असल्याने ग्रामस्थांचे लक्ष प्रशासकीय कामकाजाकडे लागले आहे. दरम्यान, उर्वरित ४२ ग्रामपंचायतींवरही विविध विभागांतील अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व नियुक्त्या तात्पुरत्या स्वरूपाच्या असल्या, तरी या कालावधीत गावांचा विकास थांबू नये, हा शासनाचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. ग्रामपंचायती हा गावाच्या विकासाचा कणा मानला जातो. त्यामुळे राहुरी तालुक्यातील या ४४ ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्ती ही केवळ औपचारिक कारवाई नसून, गावपातळीवरील प्रशासनाला शिस्तबद्ध करण्याचा प्रयत्न मानला जात आहे.

निवडणुका जाहीर होईपर्यंत ग्रामकारभार सुरळीत ठेवण्याची मोठी जबाबदारी आता प्रशासकांच्या खांद्यावर आली आहे. या निर्णयामुळे ग्रामपातळीवरील सत्तासमीकरणात तात्पुरता बदल झाला असला, तरी प्रलंबित कामे वेगाने मार्गी लागावीत, हीच ग्रामस्थांची अपेक्षा आहे. आता सर्वांचे लक्ष प्रशासकांच्या कार्यपद्धतीकडे लागले आहे.

## सत्या कडू असते त्याचे फळ गोड मिळते : महंत गुंफेकर बाबा महानुभाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव** :जीवन जगत असताना माणसाने जीवनात कष्ट कर्म चांगले करावे मृत्यू हा कोणालाही टाळता येत नाही जीवनात दुःख संकटे ही येतच असतात ते परमेश्वरच दूर करू शकतो सत्य हे कडू असते त्याचे फळ गोड मिळत असते असे विचार अहिल्यानगर जिल्हा महानुभाव परिषदेचे माजी अध्यक्ष व श्री चक्रपारी महानुभव आश्रम चे प्रमुख महंत गुंफिकर बाबा महानुभाव यांनी माळवाडगाव येथे व्याख्यानातून भाविकांसमोर मांडले. परमेश्वर दयाळू कृपाळू आहे जीवनात दुःख येत असतात दुःख आल्यावर माणसाला झोप येत नाही कोणाची निंदा करू नये अंतकरण शुद्ध असावे. अहंकारी नसावे दुःख आल्यावर परमेश्वरच आपल्याला साध्य करत असतो हिंसा निंदा न करता अहिंसेने वागावे कोणाचे अंतकरण दुखवू नका सत्याचे आचरण करावे क्रोधापासून दूर राहावे. अयोग्य गोष्टीचा त्याग करून जीवनात वाटचाल करावी मनुष्य जीवनात माणुस किती दिवस जगला याला महत्त्व देण्यापेक्षा त्यांचे काय केले याला महत्त्व आहे परलोककारमानुसार माणूस एक दिवस निघून जातो मृत्यू कोणीही टाळू शकत नाही. कर्म धर्म सांभाळावे संसार दुःखमय आहे संसारात कोणीच चुकी नाही जन्म हा पाराध्यांनी मिळाला आहे तो पारद्य व परमानुसार भोगावायचा आहे असे उपदेश गुंफेकर बाबा यांनी येथे भाविकांना केला गोकुळ जाधव यांनी महाराजांचे संत भोजन केले. या समारंभास भाविक राज बाबा कवीश्वर महंत घुगे बाबा सचिन खामनिकर, उत्तम आसने, राजेंद्र आढाव, राऊसाहेब आढाव, बाळासाहेब रायबान आसने, नानासाहेब दत्तात्रय आसने, दत्तात्रय दुशिंग, छबुराव दुशिंग, संपत उबाळे, छगन जाधव, पत्रकार विठ्ठलराव आसने यांच्यासह भाविक उपस्थित होते.

## अपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांच्याकडून पोलीस नि. ठेंगे यांचे कौतुक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्यात इन्स्पेक्शन साठी दिनांक ९ फेब्रुवारी रोजी आलेल्या अप्पर पोलीस महासंचालक, फ़ोर्स वन आणि प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबईचे कृष्णप्रकाश यांच्यासह अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी राहुरी पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राबविलेल्या ऑपरेशन मुस्कान अंतर्गत १०५ अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलींचा शोध घेऊन सुटका करून अपहरण करणाऱ्या आरोपींना अटक करून आणि लगेचच तातडीने न्यायालयात दोषारोप पाठवुन त्यांच्यावर कडक कारवाई केल्या बाबत संपूर्ण राहुरी पोलीस स्टेशन चे अधिकारी अंमलदार यांचे कौतुक करून त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले आहे.




तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील बेलवंडी येथील पोलीस स्टेशनला कार्यरत असताना बेलवंडी परिसरातील व वेगवेगळ्या राज्यातील विविध रेल्वे स्टेशन वरून किडनॅप करून आणलेल्या व वेठबिगारीत बंदिस्त ठेवून गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या २३ वेठबिगारांची मुक्तता करुन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व त्यांचे सहकारी यांनी मोठी धाडसी कारवाई केली होती. या कौतुकास पात्र ठेवून पोलीस निरीक्षक संजय ठेंगे आणि बेलवंडी पोलीस स्टेशनच्या तत्कालीन टीमचे कौतुक करून महासंचालक कृष्णप्रकाश यांनी प्रशस्ती पत्र दिले आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील पोलीस दलाचे मनोबल निश्चितच वाढले आहे.

## अजित पवार पॉलीटेक्निकच्या ३१ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शिवा ट्रस्ट, अजितदादा पवार कॉलेज ऑफ पॉलीटेक्निक, वडाळा महादेव (ता. श्रीरामपूर) येथील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे तृतीय वर्षातील विविध शाखांतील ३१ विद्यार्थ्यांची बजाज ऑटो प्रा. लि., पुणे तसेच अर्क डायनॅमिक्स अँड विजया इन्फ्राकोर प्रा. लि., श्रीरामपूर येथे निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना डिप्लोमा इंजिनिअरिंगदरम्यान वार्षिक सुमारे २.४० लाख रुपयांचे पॅकेज मिळाले असून अंतिम वर्षाचा निकाल लागण्यापूर्वीच ते कंपनीत रुजू होणार आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे १५, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे ९, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनचे ५ आणि सिव्हिल इंजिनिअरिंगचे २ विद्यार्थी आहेत. ग्रामीण भागातील अवघ्या १९ वर्षांच्या वयात विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळाल्याने कुटुंबाला आर्थिक आधार मिळत असून ही बाब अभिमानास्पद असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. दि. २९ जानेवारी २०२६ रोजी कॉलेजमध्ये बजाज ऑटो प्रा. लि., पुणे आणि अर्क डायनॅमिक्स अँड विजया इन्फ्राकोर प्रा. लि., श्रीरामपूर यांच्या सहकार्याने कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बजाज ऑटोचे विनायक प्रभाकर तसेच अर्क कंपनीकडून भोपळे पृथ्वीराज उपस्थित होते. या यशाबद्दल शिवा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार, दिलीप पवार, कॉलेजच्या प्राचार्या पी. व्ही. बोधक, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रकाश जाधव आणि जनसंपर्क अधिकारी सुशिल लांडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नेवासा न्यायालयाच्या नियोजित इमारतीच्या कोनशीलेचे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : न्यायालयाच्या प्रांगणात बांधण्यात येणाऱ्या नूतन इमारतीच्या कोनशीलेचे अनावरण व भूमिपूजन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांच्या हस्ते करण्यात आले. न्याय दानाच्या कामात सहभाग नोंदवितांना स्वतःला झोकून देण्याचा प्रयत्न करा असे आवाहन न्यायमूर्ती विभा कंकणवाडी यांनी वकील मंडळींशी संवाद साधतांना केले.



यावेळी झालेल्या कोनशीला अनावरण व भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रोहित जोशी, अहमदनगर जिल्हा व सत्र प्रभारी न्यायधिश आशिष पाटील, नेवासा न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायधिश हरिभाऊ वाघमारे,मुंबई गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष राजेंद्र उमाप, अमोल सावंत, आ. विठ्ठल लंघे,ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले,माजी जिल्हा परिषद सदस्य विजयाताई अंबाडे, नेवासा तालुका वकील संघांचे अध्यक्ष अँड.अजय रिंधे, उपाध्यक्ष अँड.सुदाम ठुबे,जिल्हा कोर्ट प्रॅक्टिशनर बार असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण घावटे यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना न्यायमूर्ती विभा कंकणवाडी म्हणाल्या की नेवासा या संतांच्या पावनभूमीचा हा परिसर सुजलाम सुफलाम झालेला असतांना येथील गुन्ह्यांचा आलेख मात्र वरचढ असल्याचा खेद त्यांनी व्यक्त केला.

याचा वकील मंडळींना फायदा असला तरी न्यायदानाच्या कामामध्ये सहभाग नोंदवितांना स्वतःला पूर्णपणे झोकून देवून कामे करण्याचे आवाहन करत लोक अदालतीच्या माध्यमातून वादाचे निराकरण होऊन वेळ वाया जाणार नाही. यासाठी प्रभाविपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. नेवासा न्यायालयाच्या नविन इमारत बांधकामात दर्जा आणि गुणवत्तेमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड स्विकारली जाणार नाही,या न्यायालयाची नवी इमारत ही २४ महिन्यात पूर्ण करण्याचा कालावधी संबंधितांना दिलेला असला तरी या कालावधीच्या आतमध्ये सुद्धा हे काम पूर्ण केल्यास काहीही हरकत नाही असे प्रतिपादन न्यायमूर्ती विभा कंकणवाडी यांनी केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन न्यायमूर्ती डॉ. प्रणिता सुगावकर आणि विधिज्ञ अनिता मोटे यांनी केले तर जिल्हा न्यायाधीश हरिभाऊ वाघमारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे, नगरपंचायतचे मुख्याधिकारी निखिल फराटे,पोलीस निरीक्षक महेश पाटील,उपनगराध्यक्ष संजय सुखधान, नगरसेवक प्रवीण सरोदे, असिफ पठाण, महेश लोखंडे, कृष्णा परदेशी, संदिप सरकाळे, राम केंदळे यांच्यासह वकील संघाचे सर्व सन्माननीय माजी अध्यक्ष पदाधिकारी, तालुक्यातील व संपूर्ण जिल्ह्यातील वकील संघाचे सर्व सदस्य तसेच न्यायिक अधिकारी,न्यायालयीन कर्मचारी, सामाजिक,धार्मिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### फक्त कौतुकच करणार नाही? तर चुकही दाखवून देईल...

नगर जिल्हाच्या पालक न्यायमूर्ती म्हूणन उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती विभा कंकणवाडी म्हणाल्या, न्यायालयात किंवा आवारात काही घटना घडल्यानंतर वकील मंडळी कामकाज बंद ठेवतात, हा पक्षकारांवर अन्याय असून त्यांचा या घटनेशी संबंध नसतांना निष्कारण वेळ वाया जात असतो वकील मंडळींनाही सन्मानाची वागणूक मिळणेही गरजेचे असल्याचे सांगून वेळ वाया न घालण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.

**प्रतिज्ञापत्र** दिनांक ०९/०२/२०२६

मा. तहसीलदार साहेब तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी साहेब राहुरी यांचे समोर मी शिला सुनील बिवाल वय ३९ रा. राहुरी, कारणे सत्य प्रतिज्ञापत्र लिहून देते की मी वरील गावची रहिवासी असून माझे पती नामे सुनील सुरेश बिवाल हे दिनांक २२/०५/२०२१ रोजी मयत झाले असून सदर मयतास पुढील प्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

| अ.नं | वारसांची नावे | वय | नाते |
|---|---|---|---|
| १ | शिला सुनील बिवाल | वय ३९ वर्षे | पत्नी |
| २ | सुरज सुनील बिवाल | वय ०९ वर्षे | आई, शीला सुनील बिवाल |
| ३ | कल्पना सुरेश बिवाल | वय ६२ वर्षे | आई |

वरील प्रमाणे मयतास कायदेशीर वारस असून वारसा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही मुले मुली मयतास वारस नाहीत.मयत हे मृत्यूपूर्वी राहुरी नगरपरिषद राहुरी येथे आरोग्य विभागात सफाई कामगार या पदावर सेवेत होते त्यांची सदर संस्थेकडून उपदानाच्या रकमा निवृत्ती वेतन व इतर शासकीय रकमा घेणे असून त्या कामी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने सदर वारस दाखला मिळणे कामी मी हे प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे. वरील प्रमाणे मी दिलेली सर्व माहिती खरी व बरोबर असून ती खोटी चुकीची आढळून आल्यास भा.द.वी. स.कलम२३६,२३७,व २२९(२) नुसार होणाऱ्या शिक्षेस व दंडास मी पात्र राहील.

शिक्का

**प्रतिज्ञापत्र करणार**
**सही**

## पान १ वरुन

### शरद पवार यांची प्रकृती बिघडली

तपासणी केल्यानंतर त्यांना पुण्यात नेण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे, त्यांच्या ताफ्यात कार्डियाक ॲम्ब्युलन्सचा समावेश होता. खबरदारी म्हणून पवार यांनी मास्क परिधान करून स्वतंत्र वाहनातून प्रवास केला.

दरम्यान, गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून त्यांनी अनेक सार्वजनिक कार्यक्रम टाळले होते. मात्र, अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांनी पुन्हा जनतेशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. गेल्या आठवड्यात सलग तीन दिवस ते पुण्यातील सहयोग सोसायटी येथे उपस्थित होते. त्यानंतर राज्यभरातून येणाऱ्या नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींमुळे गेल्या आठ ते दहा दिवसांत त्यांची मोठी दगदग झाली. या सततच्या भेटी, मानसिक ताण आणि शारीरिक थकव्याचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सध्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवले जात आहे.

रुग्णालयात कडेकोट बंदोबस्त शरद पवार रुग्णालयात दाखल होणार असल्याचे समजताच रुबी हॉल क्लिनिक परिसरात कार्यकर्ते दाखल होण्याची शक्यता आहे. सुरक्षेच्या कारणास्तव रुग्णालयाबाहेर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येत आहे.

==========================

### आरएसएसचे 'सांस्कृतिक राजकारण' देशाला विनाशाकडे नेणारे : ॲड. प्रकाश आंबेडकर

त्यांनी स्पष्ट केले की, सावरकरांचे दोन चेहरे आहेत. अटकेपूर्वीचे सावरकर क्रांतिकारी होते, पण सुटकेनंतर त्यांनी ब्रिटिशांना मदत केली. पत्री सरकारच्या काळात क्रांतिकारकांना पकडून देण्याचे काम हिंदू महासभेने केले. अशा व्यक्तीला भारतरत्न देणे आम्हाला मान्य नाही,
असे ते ठामपणे म्हणाले.

देशाच्या सीमा सुरक्षेबाबत बोलताना आंबेडकरांनी मोदी सरकारवर निशाणा साधला. चीनने लडाखमध्ये घुसखोरी केली असतानाही सरकार आदेश का देत नाही? असा सवाल त्यांनी केला. गाठ्या आणि फाफड्यांकडून लढाऊ भूमिकेची अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. चीनचे लक्ष भारताच्या ३५ कोटींच्या मध्यमवर्गीय ग्राहक बाजारपेठेवर आहे. जर आपण आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या सक्षम झालो नाही, तर भविष्यात मोठे संकट ओढवेल, असा इशारा त्यांनी दिला.

निवडणुकीतील गणितांवर भाष्य करताना आंबेडकर म्हणाले की, काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने युतीकडे गांभीर्याने पाहिले नाही. मुंबईतील पदाधिकारी निरुत्साही होते. आम्ही मुस्लिम मतदार दूर जात असल्याचा इशारा दिला होता, पण काँग्रेसने आवश्यक पावले उचलली नाहीत. परिणामी, हक्काचा मतदार एमआयएमकडे वळला. काँग्रेसने युती निभावली असती, तर महापालिकेत ८०-८५ जागा जिंकता आल्या असत्या, असे मत त्यांनी व्यक्त केले.

शेवटी, डॉ. बाबासाहेबांच्या शब्दांची आठवण करून देत ते म्हणाले की, जर आपण आता सावध झालो नाही, तर भविष्यात दोष द्यायला कोणी उरणार नाही, दोष स्वतःलाच द्यावा लागेल.

शेतकरी आत्महत्या आणि मंडी व्यवस्था

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संरक्षण दिले होते. मात्र, आज भाजप सरकार जागतिक करारांच्या नावाखाली 'मंडी व्यवस्था' मोडीत काढत आहे. गॅट कराराच्या काळात जशा आत्महत्या वाढल्या, तशीच स्थिती पुन्हा निर्माण होत असून सरकार बड्या कंपन्यांसाठी बाजारपेठ खुली करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

# गळनींबमध्ये पशुवैद्यकीय डॉक्टरवर हल्ला
## सोन्याची चैन व रोख लूट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील गळनींब गावात पशुवैद्यकीय डॉक्टरवर हल्ला करून सोन्याची चैन व रोख रक्कम जबरदस्तीने लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी मनोज पांडुरंग सटाले (रा. गळनींब, ता. गंगापूर) याच्याविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी भगवान अशोक सटाले (वय ५०, व्यवसाय – पशुवैद्यकीय डॉक्टर, रा. गळनींब) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची पत्नी अर्चना भगवान सटाले गेल्या तीन वर्षांपासून गळनींब गावच्या सरपंच असून मनोज सटाले याच्याविरोधात यापूर्वीही दोन वेळा पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल झालेल्या आहेत. यावरून दोन्ही कुटुंबांमध्ये आधीपासूनच वाद सुरू होता.

दि. ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.१५ वाजता, भगवान सटाले हे मित्र संदीप जालिंदर मैराळ यांच्यासोबत कारने छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना गळनींब–भेंडाळा रोडवर ठोळे यांच्या शेताजवळ मनोज सटाले याने स्वतःची कार आडवी लावून त्यांची गाडी थांबवली. त्यानंतर कारमधून उतरून जबरदस्तीने भगवान सटाले यांना खाली ओढून गळ्यातील १० ग्रॅम सोन्याची चैन तोडली तसेच गाडीतील गिअर बॉक्सजवळ ठेवलेली ४२,००० रुपये रोख रक्कम बळजबरीने घेतली.यावेळी विरोध केल्यावर मनोज सटाले याने धक्काबुक्की केली. भांडण सोडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या संदीप मैराळ यालाही धक्काबुक्की करण्यात आली. तसेचतू जिल्हा परिषद निवडणुकीत आमच्या विरोधात काम का केलेस? असे म्हणत शिवीगाळ करून चाकूचा धाक दाखवत पुढे आमच्या विरोधात काम केलास तर तुला जिवंत ठेवणार नाही अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.यानंतर कन्हाळे पेट्रोलपंपासमोर पुन्हा एकदा आरोपीने फिर्यादी व त्यांच्या मित्रास अडवून मारहाण व शिवीगाळ केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

## निधन वार्ता

### परीगाबाई कुमावत



**राहुरी :** तालुक्यातील टाकळीमिया येथील परिगाबाई रंगनाथ कुमावत (वय ९५ वर्षे) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले व सहा मुली, जावई, नातवंडे असा परिवार असून निर्मला कुमावत व पांडुरंग कुमावत यांच्या व्याहीं बाईच्या त्या आई होत्या. व टाकळीमिया येथील प्रगतिशील शेतकरी गंगाराम कुमावत व बबन कुमावत यांच्या त्या मातोश्री होत.

### बाबुराव जोशी



**श्रीरामपूर:** तालुक्यातील बेलापूर येथील रहिवाशी बाबुराव महादू जोशी (वय ९६) यांचे ६ फेब्रुवारी रोजीनिधन झाले त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले , सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.रामदास (काका) जोशी यांचे ते वडील होत.

## नो पार्किंग झोन श्रीरामपुरातून गायब

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर-** शहरात नो पार्किंग झोन नसल्यामुळे अनेक ठिकाणी बेकायदा वाहनतळ उभे राहिले आहेत. ठीक ठिकाणी अनधिकृत वाहनतळ तयार झाल्यामुळे चौक बेरंग दिसू लागले आहेत.

शहरात सद्यस्थितीत दुचाकी वाहनांची संख्या अमर्याद झाली असून त्यात विनापरवाना वाहन चालवणाऱ्यांची संख्या देखील मोजण्या पलीकडे आहे. इलेक्ट्रिक वाहन चालवण्यासाठी परवाना आवश्यक नसल्यामुळे लहान लहान बालके ही वाहने विरंगुळा म्हणून चालवीत आहेत

श्रीरामपूर शहरातील बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मौलाना आझाद चौक, दशमेश नगर चौक, बेलापूर भगतसिंह चौक अशा अनेक ठिकाणी रिक्षा तसेच काही ठिकाणी मोठमोठी वाहने पार्किंग केलेली दिसतात.

पालिकेच्या दप्तरी वाहनतळांची संख्या मोजकीच असली तरी मात्र प्रत्यक्षात शहर वाहन तळाने गजबजून गेले आहे.शहरात प्रदूषणमुक्त म्हणजेच इलेक्ट्रिक वाहनांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढल्याने तसेच हे वाहन चालवण्यासाठी परवान्याची गरज नसल्याने या इलेक्ट्रिक वाहनांची संख्या आणि चालविणारे मुंग्यांसारखे झाले आहेत. यामुळे अपघाताची संख्या वाढली आहे.

शहरात ठिकठिकाणी थांबत असलेल्या अनधिकृत वाहनतळामुळे दुकानदार व्यापाऱ्यांची मोठ्या प्रमाणात अडचण होत असून दुकानदारांची अवस्था ना दाद ना फिर्याद अशी झाली आहे.

## झेडपी निवडणूक कधी,मार्च की एप्रिल?
### इच्छुकांची धाकधूक वाढली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर |** जवळपास चार वर्षांपासून जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूका रखडलेल्या आहेत. राज्यातील रखडलेल्या नगरपालिका, महापालिकांपाठोपाठ १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक पार पडल्या असून आज मतमोजणीनंतर निकाल जाहीर होणार आहे. दरम्यान, ओबीसी आरक्षणाने ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्यामुळे राज्यातील २० जिल्हा परिषदा आणि त्याअंर्तगत मोडणार्या पंचायत समित्यांच्या निवडणूका रखडलेल्या आहेत. या निवडणूका दहावी-बारावीच्या परीक्षानंतर मार्च किंवा एप्रिलमध्ये न झाल्यास थेट दिवाळीनंतर होण्याची शक्यता आहे. यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी तयारी करणार्यांची धाकधूक वाढली आहे.

राज्यातील ३२ जिल्हा परिषदांपैकी १२ जिल्हा परिषदांच्या निवडणूका झालेल्या आहेत. आता उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या निवडणूका शिल्लक आहेत. निवडणूक झालेल्या झालेल्या आणि आज मतमोजणी होणार्या जिल्हा परिषदांमध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर यांचा समावेश आहे. पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाडा या तिन्ही भागांमध्ये एकाच वेळी निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली.

दरम्यान, राज्यातील २० जिल्हा परिषदांचे ओबीसी आरक्षणाची टक्केवारी ही ५० टक्क्यांच्या पुढे गेलेली आहे.

## वैजापूर पंचायत समितीत शिवसेनेची सरशी १६ पैकी ७ जागा जिकल्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडूकीत वैजापूर तालुक्यात शिवसेनेने पंचायत समितीच्या सोळापैकी सात जागावर विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने चार, भारतीय जनता पक्षाने दोन, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व अपक्ष यांनी प्रत्येकी एक जागेवर विजय मिळवला. जिल्हा परिषदेच्या आठ जागापैकी शिवसेनेने तीन, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने दोन, राष्ट्रवादी काँग्रेस व भारतीय जनता पक्षाने व अपक्ष यांनी प्रत्येकी एक जागेवर विजय मिळवला. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ अरुण जऱ्हाड व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुनील सावंत यांनी सर्व निकाला घोषित केले. सोळा टेबलवर येथील विनायकराव पाटील महाविद्यालयात मतमोजणी करण्यात आलो. पंचायत समिती निवडणुकीत शिवसेनेने घायगाव, लासूरगाव, पालखेड, संवंदगाव, जरूळ, बोरसर व मनूर या सात गणांत विजय मिळवला. या गणातील विजयी उमेदवार पूढीलप्रमाणे

घायगाव:भगवान पोपट साठे (५२३७ मते), लासूरगाव:अर्चना आप्पासाहेब शेलार (४७९७), पालखेड:राहुल शिवाजी शेळके (६२७८) संवंदगाव: वंदना बाळू शिंदे (५४२२) जरूळ : सुनील कारभारी कदम (४३४२) बोरसर:मीनाक्षी दादासाहेब पवार (४२७८) मनूर राजीव सुदाम साळुंके (५८३२): राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने वीरगाव, वांजरगाव, लाडगाव व वाकला या गणांत विजय मिळवला. राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयी उमेदवार वाकला: परिगाबाई पंढरीनाथ पवार (४४०७) विरगाव : कांता सोपानराव बारसे (५२१६) वांजरगाव :मीनाबाई प्रताप धोर्डे (५४५६) लाडगाव राहुल बाबासाहेब लांडे (४८४३)

राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाने शिऊर गणांत सोनाली किशोर जाधव या उमेदवाराला विजय मिळवून दिला त्यांना ३५१५ मते मिळाली. भारतीय जनता पक्षाने नागमठाण व महालगाव या दोन गणांत विजय मिळवाला. महालगाव गणातून शीतल राहुल आल्हाट या ४९९६ मते मिळवून विजयी झाल्या तर नागमठाण गणातून देविदास अण्णासाहेब सामसे यांनी ४९५७ मते मिळवून विजयश्री खेचून आणली. खंडाळा गणातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे हुसेन शहाबुद्दीन शेख हे ३२८७ मते मिळवून विजयी झाले. पोखरी गणातून राधिका ज्ञानेश्वर ठुबे या ४७९०मते मिळवून विजयी झाल्या.

जिल्हा परिषद गटांमध्ये शिवसेनेने संवंदगाव, लासूरगाव व घायगाव या गटात सरशी केली संवंदगाव गटातून निताताई दिपकसिंग राजपूत (९१५७), लासूरगाव गटातून संगीता सुभाष तांबे (१०, ६५५) व घायगाव गटातून श्रीराम सजनराव गायकवाड (११३४३) हे उमेदवार विजयी झाले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने बोरसर व शिऊर गटात विजय मिळवाला. शिऊरमध्ये संजय मच्छिन्द्रनाथ निकम यांनी ११०५० मते मिळवत विजय मिळवला बोरसर गटात कल्याण (मनोज) सुभाष गायके यांनी ११५०३ मते मिळवून निकटचे प्रतिस्पर्धी अजय पाटील चिकटगांवकर यांचा पराभव केला. भारतीय जनता पक्षाचे अविनाश अशोक गलांडे हे सर्वाधिक १२००२ मते मिळवून महलगाव गटात विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पंकज सुधाकर ठोंबरे यांनी वांजरगाव गटात ११२०६ मते मिळवत शिवसेनेचे बाबासाहेब जगताप यांचा पराभव केला. वाकला गटातून शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार पार्वतीबाई रामहरी जाधव या ८२३६ मते मिळवून विजयी झाल्या.

## अमेरिकेहून डॉ. निलेश दळे यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ममदापूर :** आपले संभाषण प्रभावी व परिणामकारक असायला हवे. प्रभावी बोलण्यातूनच आपण इतरांचे मन जिंकू शकतो. प्रभावी संवादातून आपला हेतू आणि उद्देश स्पष्ट होत असतो. आपला संवाद स्पष्ट अचूक व थोडक्यात असावा असे प्रतिपादन मूळचे भारतीय परंतु सध्या अमेरिका स्थित डॉ. निलेश दळे यांनी श्रीरामपूर येथील आर बी एन ब कॉलेज च्या विद्यार्थ्यांशी ऑनलाईन संवाद करताना केले. दळे हे ग्लोबल नगरी फाउंडेशन मेंबर आहेत. ग्लोबल नगरी फाउंडेशन म्हणजेच जगातील इतर देशात राहणाऱ्या भारतीय नागरिकांची संस्था आहे. भारतीय मातृभूमीशी या सर्वांची नाळ जुळलेली आहे म्हणून भारतीयांसाठी काहीतरी करत राहण्याची या फाउंडेशनची धडपड नेहमीच असते. याचाच एक भाग म्हणून शनिवारी आरबीएनबी कॉलेजच्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन मार्गदर्शनपर डॉ. निलेश दळे यांनी संवाद साधला. यावेळी प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे हे सर्व शिक्षकांसमवेत उपस्थित होते.

डॉ. दळे हे मूळचे राहाता तालुक्यातील असून त्यांनी रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेतले आहे. सध्या ते अमेरिकेत निसान या आंतरराष्ट्रीय कंपनीत उच्च पदावर कार्यरत आहे.प्रभावी परिणाम निर्माण करणारा संवाद' या या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला . त्यांचे विविध विषयांवर ३० पेक्षा अधिक पेटंट प्रकाशित आहेत.डॉ. दळ म्हणाले, संवादात हावभाव, शरीराची हालचाल व डोळ्यांचा कॉन्टॅक्ट हे फार महत्त्वाचे घटक आहेत. तसेच संवादात साद-प्रतिसाद व सकारात्मक दृष्टी असावी लागते. चांगले ऐकल्याने व चांगले वाचल्याने देखील आपले संवाद सुधारू शकतात. सरावाने आपले संवाद कौशल्य सुधारत असतात आणि त्यासाठी आपल्यात आत्मविश्वास व सकारात्मकता असायला हवी, कारण त्यातून आपले प्रभावी संवाद विकसित होतील. व्याख्यानमालेचा सर्वांनीच आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी फायदा करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे यांनी मार्गदर्शन केले. ग्लोबल नगरी फाउंडेशनचे सदस्य डॉ. रोहीत काळे, डॉ. किशोर गोरे व डॉ. अविनाश मेहत्रे यांनीही याप्रसंगी आपले अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाला मीनाताई जगधने उपस्थित होत्या.

# जुन्नरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला यश
## आ.शरद सोनवणे यांना 'कही खुशी कही गम' याचा प्रत्यय

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जुन्नर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वाधिक चार जागा जिंकत जिल्हा परिषदेची सत्ता खेचण्यात माजी आमदार अतुल बेनके यांना यश मिळाले. तर शिवसेना पक्षाला तीन जागा तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला एक जागा मिळाली. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट व आरपीआय यांची आघाडी होती तर शिवसेना शिंदे गटाने सर्व जागांवर स्वतंत्र उमेदवार उभे केले होते.

लेण्याद्री येथे सोमवार दिनांक ९ रोजी सकाळी दहा वाजता मतमोजणी प्रक्रिया सुरू करण्यात आली. या निवडणुकीच्या निकालानंतर जुन्नर तालुक्यामध्ये आमदार शरद सोनवणे यांना कही खुशी कही गम याचा प्रत्यय आला. जिल्हा परिषदेच्या ८ पैकी तीन जागा, पं. स. च्या १६ पैकी ८ जागेवर शिवसेनेला यश मिळाले असून राष्ट्रवादी व शिवसेना ठाकरे पक्ष यांच्या महाआघाडीला ८ पैकी ५ (राष्ट्रवादी ४ व शिवसेना ठाकरे १) जागा मिळाल्या. येथे पंचायत समिती मध्ये राष्ट्रवादीच्या सहा उमेदवारांचा विजय झाला तर एक भाजपचा व एक शिवसेना ठाकरे पक्षाचा सदस्य निवडून आला आहे यामुळे पंचायत समितीच्या सभापती पदी आमदार शरद सोनवणे यांच्या शिवसेनेला अवघ्या एका मताची गरज असून शिवसेनेचा सभापती होऊ शकतो.

या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे चार वेळा जिल्हा परिषदेवर निवडून गेलेल्या आशाताई बुचके यांचा पराभव जिव्हारी लागणारा ठरला. येथील तिरंगी लढतीमध्ये त्या तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या येथे विद्यमान सदस्य गुलाब शेठ पारखे हे निवडून आले. तसेच बाजार समितीचे विद्यमान दोन संचालक जिल्हा परिषदेची निवडणूक लढवत होते. यामध्ये विद्यमान संचालक संतोष चव्हाण,संचालिका प्रियंका शेळके यांचा पराभव झाला तर शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख व बाजार समिती संचालक माऊली खंडागळे यांच्या पत्नीलाही पराभवाचा सामना करावा लागला. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या सुनबाई कविता पवार यांचा पराभव झाला असून जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे यांची सुनबाई माई लांडे यांचा विजय झाला आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहल शेळके यांचाही पराभव झाला येथे शिवसेनेच्या स्मिता पंकज कणसे यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला. मागील निवडणुकीत केवळ एकमताने पराभव झालेल्या मंगेशअण्णा काकडे यांनी सुमारे ७ हजार पेक्षा जास्त मतांनी विजय मिळवत विजय कुऱ्हाडे यांचा पराभव केला.

मतमोजणीसाठी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची गर्दी होण्यास सकाळपासूनच सुरुवात झाली. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी विजयी उमेदवारांची घोषणा करताच कार्यकर्त्यांनी गुलाल भंडाऱ्याची उधळण करत विजयोत्सव साजरा केला.

आमदार शरद सोनवणे व माजी आमदार अतुल बेनके यांच्या दृष्टीने ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात होती. पंचायत समितीचे सभापती पद हे अनुसूचित जमाती महिला आरक्षित आहे. शिवसेनेच्या तांबे गणाच्या विजयी उमेदवार कमल शेळकंदे यांची सभापती पदी वर्णी लागण्याची शक्यता आहे .

## मुळशीत राष्ट्रवादीचे वर्चस्व

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत मुळशीत राष्ट्रवादीने अपेक्षित वर्चस्व संपादन केले . जिल्हा परिषदेवर शांताराम इंगवले व मिलिंद वाळंज यांनी बाजी मारली. हिंजवडीतील जागा भाजपाच्या शिवाजी बुचडे यांनी खेचून आणली.

हिंजवडी-माण परिसरातील राजकीय चित्र स्पष्ट केले असून, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील थेट संघर्ष पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. जिल्हा परिषदेच्या हिंजवडी-माण गटात भाजपाचे शिवाजी बुचडे पाटील यांनी विजय मिळवत पक्षाचे वर्चस्व राखले आहे. तर पंचायत समितीच्या हिंजवडी गणात भाजपाच्या ऐश्वर्या वाघमारे, तर माण गणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंदा बाबाजी शेळके विजयी झाल्या आहेत.

मुळशी पंचायत समितीवर राष्ट्रवादी अजीत पवार गटाचे ३, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे २ तर भाजपाचा १ उमेदवार निवडून आला आहे. मुळशीतील विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे

*मुळशी ि षिळपरश्र निकाल* *पौड अंबडवेट जिल्हा परिषद गट* मिलींद वाळंज राष्ट्रवादी काँग्रेस ५२९७ मतांनी विजयी *हिंजवडी-माण गट* शिवाजी बुचडे, भाजपा १९६६ मतांनी विजयी *भुगांव पिरंगुट गट* शांताराम इंगवले राष्ट्रवादी काँग्रेस १३८४ मतांनी विजयी *पौड पंचायत समिती गण* काजल मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस २१४५ मतांनी विजयी *अंबडवेट पंचायत समिती गण* प्रविण धनवे, राष्ट्रवादी काँग्रेस १७७६ मतांनी विजयी *माण पंचायत समिती गण*मंदा शेळके, राष्ट्रवादी काँग्रेस २३१० मतांनी विजयी *हिंजवडी पंचायत समिती गण* ऐश्वर्या वाघमारे, भाजपा१३२२ मतांनी विजयी *भूगाव पंचायत समिती गण* दगडू करंजावणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट ४३८ मतांनी विजयी *पिरंगुट पंचायत समिती गण* राहुल पवळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट ३६३ मतांनी विजयी

# अहिल्यानगर जिल्हा व्हॉलीबॉलची श्रीरामपूर येथे निवड चाचणी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर, :** अहिल्यानगर जिल्हा पासिंग व्हॉलीबॉल संघटनेच्यावतीने वर्धा येथे होणाऱ्या २१ वर्षांखालील मुला- मुलींच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी पुणे विभागातील मुला- मुलींच्या संभाव्य खेळाडूंची निवड चाचणी स्पर्धा तसेच चंद्रपूर येथे होणाऱ्या १६ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील संभाव्य खेळाडूंची निवड चाचणी श्रीरामपूर येथील महाले पोद्दार मैदानावर घेण्यात आली.

सदर निवड चाचणी राष्ट्रीय व्हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र कोहकडे व पार्थ दोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. खेळाडूंच्या कौशल्य, तांत्रिक क्षमता, शारीरिक तंदुरुस्ती तसेच संघभावना या निकषांवर बारकाईने निरीक्षण करून निवड प्रक्रिया राबवण्यात आली. निवड चाचणी स्पर्धेच्या प्रमुख अतिथी म्हणून नगरसेविका स्नेहलताई खोरे उपस्थित होत्या. त्यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रामीण भागातूनही दर्जेदार खेळाडू घडत असून अशा निवड चाचण्या नव्या गुणवत्तेला संधी देणाऱ्या ठरतात.

यावेळी नगरसेवक मनोज लबडे, उद्योजक सोमनाथ घुगे, दादासाहेब पवार, प्राचार्य बत्रा, पुणे विभाग व्हॉलीबॉल सचिव नितीन बलराज, पापा शेख, रमेश चांडे, धनंजय माळी, आदित्य पटारे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी आयोजकांचे व प्रशिक्षकांचे कौतुक करत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. दोन्ही वयोगटांच्या निवड चाचणीत पुणे जिल्हा, सोलापूर जिल्हा व अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण सुमारे १५० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. मैदानावर खेळाडूंनी दाखवलेला जोश, शिस्तबद्ध खेळ व स्पर्धात्मक भावना पाहून उपस्थित प्रेक्षकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या निवड चाचणीमधून निवडलेले खेळाडू आगामी राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पुणे विभाग व अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार असून, भविष्यात राष्ट्रीय पातळीवर चमकण्याची संधी त्यांना मिळेल,असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.


## नशिबाची परिक्षा

मंगळवार दि . १० फेब्रुवारी २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२० ३४६ ४९० | ३-७ | १२४ १७९ ११५

जोड ३१-९७-६२ ०४-३५

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१४७ २४८ ६६० | २-४ | १५८ १४९ ११२

जोड २६-०४- ९१ ५८-४३

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१५० १६९ ११४ | ६-३ | १३९ ५८० ६७०

जोड ६०-२३-७१ ४५-३९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द•ख•ल

### मोबाईल खरेदीतून वाद; विनयभंग व मारहाणीचे परस्पर गुन्हे

**नगर** : शहराच्या स्टेशन रोड परिसरातील एका मोबाईल शॉपीमध्ये मोबाईल खरेदीच्या व्यवहारातून वाद निर्माण होऊन त्याचे रूपांतर विनयभंग व हाणामारीत झाल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. या प्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस दोन्ही बाजूंनी तपास करीत आहेत. एका २० वर्षीय युवतीने दिलेल्या फिर्यादीनुसार, तिने संबंधित मोबाईल शॉपीमधून जुना मोबाईल खरेदी केला होता. मोबाईलमध्ये तांत्रिक अडचणी व खाते सुरू न झाल्याने ती रात्री पुन्हा दुकानात गेली असता दुकानाच्या गल्लूयावर बसलेल्या संजूर मल्लुद्दीन आलम शेख (वय ४४, रा. रेल्वे स्टेशन परिसर) याने मोबाईल क्रमांकाची मागणी केली. युवतीने नकार दिल्यानंतर त्याने वाईट हेतूने विनयभंग केला तसेच जातीवाचक व अश्लील शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिसांनी शेख विरोधात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, दुसऱ्या बाजूने संजूर शेख यांनीही फिर्याद दाखल करत युवती व तिच्या नातेवाईकांनी मारहाण करून दुकानाची तोडफोड केल्याचा आरोप केला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

### संत रविदास महाराज चौक नामफलकाचे आ. पाचपुते यांच्या हस्ते अनावरण

**अहिल्यानगर** : श्रीगोंदा येथील वडघुल गावात संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या हस्ते 'संत रविदास महाराज चौक' या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.कार्यक्रमात बोलताना आमदार विक्रमसिंह पाचपुते म्हणाले की, साधुसंतांनी दिलेला समतेचा आणि मानवतेचा संदेश आजच्या युगातही तितकाच प्रेरणादायी आहे. संत रोहिदास महाराजांनी आपल्या कार्यातून समाजाला भक्ती आणि शक्तीचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांनी समाजात एकता आणि प्रेरणा निर्माण होत असून, नव्याने नामकरण झालेला संत रोहिदास चौक समाजासाठी प्रेरणास्थान ठरेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण करणाऱ्या उत्तम खरड यांचा सत्कार



**ढोरजळगांव** : शेवगांव तालुक्यातील देव टाकळी येथील उत्तम केशव खरड यांनी पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल देव टाकळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. श्री खरड हे महावितरण मधून सेवानिवृत्त झाल्यावर. त्यांना धार्मिक कार्याची आवड असल्यामुळे ते अत्यंत पवित्र असणारी नर्मद परिक्रमा पूर्ण करू शकले.त्यांनी दि ०४ नोव्हेंबर २०२५ मध्य प्रदेश (ओंकारेश्वर) येथून प्रारंभ केला व ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी या परिक्रमेची सांगता झाली. त्यांच्या आगमनानंतर त्यांनी आनलेल्या नर्मदेचा पवित्र जल कलशा समवेत त्यांची देवटाकळी गावामध्ये सकाळी ९ ते १० या वेळेत टाळ मृदुगांच्या भक्तीमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली, त्यानंतर १०:३० ते १२:३० या वेळेत हभप. साईनाथ महाराज वाकिकर (आळंदी) यांची किर्तनसेवा पार पडली त्यांनंतर खरड परिवारा तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विशाल महाराज माने, अक्षय महाराज गायकवाड, शिव महाराज लोणवार, आखिलेश महाराज खरड , ग्रामस्थ भजनी मंडळ, सरपंच, उपसरपंच तसेच नातेवईक व समस्थ ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांचे किरण आगळे यांनी आभार मानले.

# संभाजी ब्रिगेडच्या प्रतीकात्मक दशक्रियेला 'कावळा'ही फिरकला नाही !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

श्रीगोंदा : श्रीगोंदा शहरातून जाणारे प्रमुख रस्ते एमएसआयडीसी कंपनीच्या ठेकेदाराने अक्षरशः चिरफाड करून ठेवले आहेत. रस्ते खोदून अनेक दिवस उलटले, पण कामाची गती पाहता काम सुरू आहे हे फक्त फलकापुरतेच उरले आहे. प्रत्यक्षात मात्र नागरिकांच्या सहनशक्तीची रोजच परीक्षा घेतली जात आहे. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या प्रतीकात्मक दशक्रियेला अधिकारी नावाचा कावळाही फिरकला नाही ! त्यामुळे नागरीकातून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे.




श्रीगोंदा शहरातून जाणारे प्रमुख रस्ते एमएसआरडीसी कंपनीच्या ठेकेदाराने रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली रस्ते खोदून ठेवलेले अनेक दिवस उलटले तरीही कामात कसलीही प्रगती नसल्यामुळे नागरिकांना धूळ, चिखल, अपघाताचा धोका आणि वाहतूक कोंडी हे सगळे श्रीगोंदेकरांचे नित्याचे पाचवीला पूजले आहे. परंपरेनं रस्ता केला की लगेच बुजवायचा हा जुना शहाणपणाचा नियम इथे ठेकेदाराने थेट खड्ड्यात टाकला आहे.

प्रत्यक्षात मात्र नागरिकांच्या सहनशक्तीची रोजच परीक्षा घेतली जात आहे. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या प्रतीकात्मक दशक्रियेला ''अधिकारी'' नावाचा कावळाही फिरकला नाही ! त्यामुळे नागरीकातून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे या प्रशासनिक बेशिस्तीच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेडने प्रशासनाच्या प्रतीकात्मक दशक्रिया विधीचे आंदोलन केले. ढोल-ताशे नव्हते, घोषणा होत्या पण प्रशासनातला जिवंत अधिकारी नावाचा कावळाही त्या ठिकाणी फिरकला नाही.

#### रस्ते खोदण्याची परवानगी पटकन मिळते, मग दुरुस्तीची जबाबदारी कुणाची?

श्रीगोंद्यात रस्ते खोदण्याची परवानगी पटकन मिळते, मग दुरुस्तीची जबाबदारी कुणाची?ठेकेदार झोपेत, अधिकारी मौनात आणि जनता त्रस्त आहे त्यामुळे हा कोणता विकास? असा प्रश्न श्रीगोंद्यातील नागरिकांना पडला असून याचे उतर देणार कोण असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

#### दशक्रिया वर जमेल की वर्षश्राद्ध घालावे लागेल : कापसे

दशक्रिया विधी आंदोलनाने प्रशासन जागं होणार की पुढची दशक्रिया 'खऱ्या कामाची' होईपर्यंत वाट पाहणार? का त्या कामासाठीं प्रथम वर्षश्राद्ध घालावे लागेल असा प्रश्न आंदोलनकर्त्यांना पडला आहे त्यामुळे प्रशासन कधी जागे होणार याकडे सर्वांचे लक्ष लावून राहिले आहे.

#### लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांबाबत संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात येणारे प्रतीकात्मक दशक्रिया आंदोलन प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. संबंधित कामांबाबत ठोस कार्यवाही करण्याचे आश्वासन तहसील प्रशासनाकडून देण्यात आले.

म्हणजे दशक्रिया खरी, पण प्रशासन अजूनही निर्जीव अवस्थेतच! असल्याचे खुलेआम बोलले जात आहे या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे जिलाध्यक्ष अरविंद कापसे , नाना शिंदे,संतोष इथापे आदी मान्यवरांनी सहभाग घेतला होता.

## आषाढी वारीतील गैरव्यवहार प्रकरणी ग्रामसेवक दोषी !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : आषाढी पायी दिंडी वारीच्या अनुषंगाने झालेल्या आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता प्रकरणी श्रीगोंदा पंचायत समितीविरोधात संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आलेल्या धरीला पंढरीचा चोर या प्रतीकात्मक आंदोलनाची दखल घेत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (सी.ई.ओ.) यांनी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालात संबंधित ग्रामसेवक दोषी आढळल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, या प्रकरणात सहभागी असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अभय देण्यात आल्याचा आरोप करत संभाजी ब्रिगेडने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. संभाजी ब्रिगेडच्या वतीने आषाढी वारीतील निधी खर्चाबाबत यापूर्वीच गंभीर आरोप करण्यात आले होते. या प्रकरणाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी धरीला पंढरीचा चोर हे प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले होते.



पंचायत समिती स्तरावर सुरू असलेल्या चौकशीदरम्यान संबंधित ग्रामसेवक सहकार्य करत नसल्याचे निदर्शनास आल्याने, या कथित घोटाळ्याची जिल्हा परिषदेमार्फत सखोल चौकशी करण्याची ठाम मागणी संभाजी ब्रिगेडने केली होती. या मागणीची दखल घेत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चार वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती नियुक्त करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. समितीने सादर केलेल्या अहवालात संभाजी ब्रिगेडने केलेले आरोप सिद्ध झाले असून, संबंधित ग्रामसेवकांनी शासकीय निधी खर्च करताना शासन नियमांचे उल्लंघन केल्याचे तसेच खर्चामध्ये गंभीर त्रुटी व दोष आढळून आल्याचे नमूद करण्यात आले आहे. या अहवालाच्या आधारे बेलवंडी, देवदैठण, टाकळी कडेवळीत व घोगरगाव येथील ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांवर प्रशासनामार्फत कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान, या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग असूनही चौकशीदरम्यान त्यांना वगळण्यात आल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे. या गंभीर बाबींची वरिष्ठ पातळीवर अधिक सखोल चौकशी करून सर्व दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत संभाजी ब्रिगेडचा लढा सुरूच राहील, असा इशारा तालुकाध्यक्ष इंजि. शामभाऊ जरे यांनी दिला आहे.

## लोककला-लोकपरंपरा देशाच्या इतिहासाचे प्रतिनिधित्व करतात : डॉ. महेंद्र कदम




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : कोणतेही लोकसाहित्य, लोककला किंवा लोकपरंपरा या जाती-धर्माचे प्रतिनिधित्व करत नसून त्या देशाच्या परंपरा, संस्कृती आणि इतिहासाचे प्रतिनिधित्व करतात. परंपरा टाकाऊ नसून त्यामागे श्रम व आचारपरंपरेचा मोठा वारसा दडलेला आहे, असे प्रतिपादन विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेंभुर्णीचे प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनी केले. ते दादा पाटील महाविद्यालयात आयोजित आधुनिक परिस्थितीत लोककला, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती : आव्हाने आणि संधी या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप प्रसंगी बोलत होते.

मराठी, हिंदी व इंग्रजी विभाग तसेच वाणिज्य, अर्थशास्त्र व बी.बी.ए. (सीए) विभागांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत २०४७ : वाणिज्य, अर्थशास्त्र व व्यवस्थापनाच्या माध्यमातून शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलताना डॉ. कदम यांनी विविध लोकपरंपरांचा संदर्भ देत नवरात्र, विवाहविधी, सण-उत्सव, रावण दहन, हनुमान परंपरा यामागील ऐतिहासिक व कृषी संस्कृतीतील अर्थ उलगडून सांगितला. प्रत्येकाने आपल्या गावच्या जत्रा-यात्रा आणि त्यामागील परंपरा अभ्यासण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. विदेशी प्रमुख पाहुणे डॉ. जॉर्डन लूम यांनी भारताच्या आर्थिक प्रगतीबरोबरच सर्वसमावेशक विकास, पर्यावरणीय संतुलन व आरोग्य जनजागृतीवर भर देण्याचे आवाहन केले. परिषदेत विविध मान्यवर अभ्यासकांनी मार्गदर्शन केले, तर लोककला सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिषद यशस्वीरीत्या पार पडली.

## सर्जेपुरा पोस्ट ऑफिस बंद करण्याच्या हालचालींना तीव्र विरोध

### लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : शहरातील सर्जेपुरा येथील पोस्ट ऑफिस बंद करण्याबाबत सुरू असलेल्या हालचालींमुळे परिसरात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयाला स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी जोरदार विरोध दर्शवित, सर्जेपुरा पोस्ट ऑफिस कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, अशी ठाम मागणी केली आहे. यासंदर्भात उपमहापौर, नगरसेविका व नगरसेवकांनी वरिष्ठ डाक अधीक्षक, मुख्य पोस्ट ऑफिस, अहिल्यानगर यांना लेखी निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सर्जेपुरा पोस्ट ऑफिस हे सर्जेपुरा, तेलीखुंट, डाळमंडई परिसरातील रामवाडी, बागडपट्टी, दादा गॅरेज, कोठला बस स्थानक, दिल्ली गेट परिसर, बालिकाश्रम रोड आदी दाट लोकवस्तीच्या भागासाठी अत्यंत महत्त्वाचे सेवा केंद्र आहे. या परिसरातील खातेदारांची संख्या मोठी असून शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच सुमारे २० अल्पबचत एजंट व त्यांच्याशी संबंधित शेकडो खातेदार या पोस्ट ऑफिसवर अवलंबून आहेत. पोस्ट ऑफिस बंद झाल्यास या सर्वांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणार असल्याचे लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले आहे. याशिवाय या परिसरात पंजाब नॅशनल बँक, एस.टी. विभागीय कार्यशाळा, पोलीस मुख्यालय, ओरिएंटल बँक, लातूर बँक, बँक ऑफ इंडिया, इंडसइंड बँक यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय व खासगी संस्था कार्यरत आहेत. या संस्थांच्या दैनंदिन व्यवहारांसाठी सर्जे पुरा पोस्ट ऑफिस हे सोयीचे व जवळचे केंद्र असून, ते बंद झाल्यास व्यवहारांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे. विशेषतः महिला अल्पबचत एजंट यांच्या रोजगारावर आणि कामकाजावर याचा गंभीर परिणाम होईल, अशी स्पष्ट भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

## सोमैया महाविद्यालयात मोडी लिपी प्रारंभिक प्रशिक्षण वर्ग उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : इतिहास विभाग के.जे.सोमैया महाविद्यालय कोपरगाव, आणि 'वसुंधरा' भाषा मोडी लिपी संवर्धन, संशोधन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीमध्ये प्रा. महेश जोशी यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात मोडी लिपी प्रारंभिक प्रशिक्षण वर्ग उत्साहात संपन्न झाला अशी माहिती प्रा. डॉ. विजय ठाणगे यांनी दिली. या संदर्भात अधिक माहिती देताना डॉ. ठाणगे पुढे म्हणाले की, इतिहास आणि सामाजिक शास्त्रात उच्च शिक्षण घेणाऱ्या तसेच भविष्यात संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सैद्धांतिक अभ्यासाबरोबरच प्रात्यक्षिके देखील महत्त्वाची असतात. याच उद्देशाने 'मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग' हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो.

यासाठी पुणे येथील वसुंधरा भाषा मोडी लिपी संवर्धन संशोधन केंद्र, पुणे येथील मोडी लिपी तज्ज्ञ प्रा. महेश जोशी यांना निमंत्रित केले जाते. यंदाही इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होत हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी या प्रशिक्षण वर्गाचा समारोप संपन्न झाला. या सत्रात प्रशिक्षक व अतिथी प्राध्यापक महेश जोशी म्हणाले की, ऐतिहासिक संशोधनासाठी मोडी लिपी प्रशिक्षण खूप गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांना व एकूणच जाणकारांना खरा इतिहास जाणून घ्यायचा असेल तर मोडी लिपीचे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. आपण सर्वांनी मोडी लिपी समजून घेऊन आपला ऐतिहासिक ठेवा जतन करायला हवा. समारोप सत्राच्या अध्यक्षा डॉ. सुरेखा भिंगारदिवे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी मोबाईलवर वेळ वाया घालविण्यापेक्षा मोडी लिपीचा सराव केल्यास ते रोजगाराचे एक ठोस साधन बनू शकते.


**Change Name**
I Am Changing My Name From :
Old Name : **Sha Rajmahamad Maheboob**
New Name : **Rajmohmad Mehboob Shah**
Adhar : 439134938647


# राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाला उपविजेतेपद

## काकडे विद्यालयाच्या श्रेयश देवढेला रौप्य पदक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव** : छत्तीसगड मधील बिलासपूर येथे संपन्न झालेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत आबासाहेब काकडे विद्यालयाचा अष्टपैलू खेळाडू श्रेयश देवढे याने महाराष्ट्र संघाकडून खेळताना दैदिप्यमान यश संपादन केले आहे. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाला यजमान छत्तीसगड संघाकडून पराभव पत्करावा लागल्याने महाराष्ट्राला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.



मात्र, श्रेयशने मिळवलेल्या या राष्ट्रीय पदकामुळे आबासाहेब काकडे विद्यालयाचे नाव देशाच्या क्रीडा नकाशावर सुवर्ण अक्षरात कोरले गेले आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थेचे प्रमुख डॉ. ड. विद्याधर काकडे, सहप्रमुख हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ आणि विश्वस्त पृथ्वीसिंग काकडे यांनी श्रेयशचे कौतुक केले.

तसेच शालेय शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, अशोक आहेर, प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे, रवींद्र आगळे, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर व सर्व शिक्षकांनी श्रेयश देवढे याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

#### अंतिम सामन्यात चुरशीची लढत

या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले होते. अंतिम फेरीत महाराष्ट्राचा मुकाबला प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या छत्तीसगड संघाशी झाला. या सामन्यात दोन्ही संघांनी विजयासाठी सर्वस्व पणाला लावले होते, परंतु स्थानिक मैदानावर खेळणाऱ्या छत्तीसगडने महाराष्ट्रावर मात केली. पराभव झाला असला तरी, श्रेयश देवढे आणि महाराष्ट्र संघाने दिलेली झुंज क्रीडाप्रेमींची मने जिंकणारी ठरली.

#### यशात मार्गदर्शकांचा वाटा

श्रेयशच्या या यशामागे त्याची जिद्द आणि विद्यालयाचे क्रीडा शिक्षक कल्पेश भागवत, संतोष ढोले, सचिन वाल्हेकर व विक्रम घुटे वैष्णवी फलके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षकांनी दिलेल्या कानमंत्रामुळेच श्रेयश राष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उमटवू शकला.

## घारगाव येथे कृषी मेळावा; शेतकऱ्यांना आधुनिक व जैविक शेतीचे मार्गदर्शन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : घारगाव येथील श्री दत्तकृपा शैक्षणिक कृषी ग्रामविकास प्रतिष्ठान अंतर्गत साईकृपा कृषी महाविद्यालय, घारगाव येथे ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत परिसरातील शेतकऱ्यांसाठी कृषी मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एच. निंबाळकर हे होते.

तर उद्घाटन श्री दत्तकृपा शैक्षणिक संकुल घारगावचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे व सचिव अर्चना पानसरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी श्रीगोंदा क्रांती चौधरी, मंडळ कृषी अधिकारी शितल आरु, कृषी सहाय्यक अधिकारी किरण घोडके यांच्यासह स.म.शी. नागवडे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन सुभाष शिंदे, मढेवडगावचे सरपंच प्रमोद शिंदे, उक्कडगावचे सरपंच प्रसाद महाडिक, रयत शिक्षण संस्थेचे सदस्य स्मितल वाबळे आदी उपस्थित होते.

मेळाव्यात सिजेंटा, बायस्टेट, बी. ए. एस. एफ., बायर, कोरोमंडल आदी शेती औषध कंपन्यांचे स्टॉल लावण्यात आले होते. प्रस्ताविकात कृषीदूत कुणाल काळभोर यांनी भविष्यकाळातील शेती व्यवसायाचे महत्त्व सांगून कार्यक्रमाची उपयुक्तता मांडली. जैविक शेती मित्र संतोष पानसरे यांनी जैविक शेतीचे फायदे व उपयोग यावर मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रा. डॉ. के. एच. निंबाळकर यांनी पिकांचे भाव, आधुनिक शेती व बाजारपेठ याबाबत माहिती दिली. तसेच स्मितल वाबळे यांनी शेतमालाचा भाव वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजना स्पष्ट केल्या.

मढेवडगाव व उक्कडगाव या गावांमध्ये साईकृपा कृषी महाविद्यालयाचे ११ विद्यार्थी कृषीदूत व कृषीकन्या म्हणून कार्यरत असून ते गावात पूर्णवेळ थांबून शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन करत आहेत. या कृषी मेळाव्यास मढेवडगाव व उक्कडगाव परिसरातील सुमारे १०० शेतकरी उपस्थित होते.

# बारामती विधानसभा मतदार संघाकरिता प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** २०१-बारामती विधानसभा मतदारसंघाच्या संभाव्य पोट निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छायाचित्र मतदारयादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे पारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. नागरिकांनी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मतदार यादी संदर्भातील दावे व हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित बैठकीस उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. डुडी म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ जानेवारी २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित करण्यात आलेल्या



छायाचित्र मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनर्नरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत प्रारुप यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप मतदार यादीवर बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे दावे व हरकती सादर येणार आहे. तरी मतदारांनी त्यांचे नाव प्रारूप मतदार यादीमध्ये आहे की नाही, याची तपासणी करावी. नाव नसल्यास फॉर्म क्रमांक ६ भरून मतदार यादीत नाव नोंदवावे. तसेच नावामध्ये किंवा मतदार यादीतील तपशिलामध्ये दुरुस्ती आवश्यक असल्यास फॉर्म क्रमांक ८ भरावा, असे आवाहन डुडी यांनी केले आहे. प्राप्त दावे व हरकतीवर शुक्रवार ६ मार्च २०२६ पर्यंत निर्णय घेण्यात येणार असून मंगळवार १० मार्च २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी डुडी यांनी दिली आहे. यावेळी जिल्हाधिकारी डुडी यांच्या हस्ते विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना प्रारूप मतदार यादीचे वितरण करण्यात आले.

# जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष रणजित शिवतरेंचा पराभव

## भोरला राष्ट्रवादीसाठी गड आला पण सिंह गेला; तर भाजपसाठी 'कही खुशी कही गम'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल दि.९ निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विकास खरात यांनी जाहीर केला.भोर तालुक्यातील चार जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीच्या आठ गणांसाठी झालेल्या निवडणुकीत महायुती मधील भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस हे दोन प्रमुख पक्ष समोरासमोर आल्याने शेवटपर्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या चार जागांपैकी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रत्येकी दोन उमेदवार विजयी झाले आहेत. तर पंचायत समितीच्या आठ जागांपैकी भाजपा आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसने प्रत्येकी चार उमेदवार निवडून आले आहेत. जनतेने समसमान कौल दिला असला तरी देखील भाजपचे नेते माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या पत्नी स्वरूपा थोपटे यांनी उत्रोली - कारी जिल्हा परिषद गटातून



राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रणजीत शिवतरे यांचा पराभव केल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेससाठी गड आला पण सिंह गेला तर भाजपसाठी कही खुशी कही गम अशी अवस्था झाली आहे. तालुक्यातील भोलावडे - शिंद जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रवीण जगदाळे निवडून आले असून त्यांनी जिल्हा परिषद माजी सदस्य तथा भाजपचे उमेदवार विठ्ठल आवाळे यांचा पराभव केला आहे. तालुक्याच्या पूर्व भागातील भोंगवली कामथडी गटातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विक्रम खुटवड हे विजयी झाले आहेत.मात्र या ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बंडखोर अपक्ष उमेदवार चंद्रकांत बाठे यांनी दुसऱ्या क्रमांकाची मते घेत चांगली लढत दिली तर भाजपाचे महेश टापरे तिसऱ्या क्रमांकावर राहिले आहेत. महामार्गालगतच्या वेळू-नसरापूर गटातून भाजपाचे पोपट सुके विजयी झाले आहेत.या ठिकाणी शिवसेना उबाठाचे अनिकेत शिंदे आणि शिवसेनेचे अमोल पांगारे यांनी अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाची मते घेत चांगली लढत दिली असून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे गणेश खुटवड चार क्रमांकावर आहेत.पंचायत समितीसाठी भाजपाच्या गीता आंबवले (कारी) सुषमा चव्हाण (उत्रोली ) रोहन बाठे (भोंगवली )ज्ञानेश्वर पांगारे ( वेळू) गणातून विजयी झाले आहेत. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विशाल कोंडे (नसरापूर), तृप्ती खुटवड (कामथडी), राजेश बोडके (भोलावडे ),मनीषा कंक (शिंद) गणातून विजयी झाले आहेत.

## द•ख•ल

### शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथे २६ वा पदविका प्रदान समारंभ

**नाझरे सुपे :-** शासकीय तंत्रनिकेतन, पुणे या संस्थेचा २६ वा पदविका प्रदान समारंभ गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेच्या प्रांगणात सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास जेनकोव्होल समूह, मुंबईचे चेअरमेन डॉ. दीपक घैसास हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या समारंभात स्थापत्य, विद्युत, अणुविद्युत व दूरसंचार, यंत्र, धातुशास्त्र, संगणक, माहिती तंत्रज्ञान तसेच ड्रेस डिझायनिंग अँड गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग या शाखांतील स्नातकांना पदविका प्रदान करण्यात येणार आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांपैकी शाखानिहाय प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना मानचिन्हे व पारितोषिके देण्यात येणार आहेत, असे संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र का. पाटील यांनी कळविले आहे.

### सिपेट छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु

**नाझरे सुपे :-** केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी व प्रौद्योगिकी संस्था (सिपेट), छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रक्रिया सुरु झाली आहे. सिपेट ही रसायन व खत मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय स्वायत्त संस्था असून महाराष्ट्रातील प्लास्टिक उद्योगांसाठी तांत्रिक सहाय्य, कुशल मनुष्यबळ निर्मिती व संशोधन कार्य करते.

सिपेटमध्ये प्रवेशासाठी दरवर्षी ऑल इंडिया कॉमन ॲडमिशन टेस्ट (उअढ) घेण्यात येते. यंदा ही प्रवेश परीक्षा ७ जून २०२६ रोजी होणार असून प्रवेश अर्ज २८ मे २०२६ पर्यंत सादर करता येतील. दहावी, बारावी तसेच बी.एस्सी (अंतिम वर्ष) परीक्षा देत असलेले विद्यार्थी निकालाची वाट न पाहता अर्ज करू शकतात. सिपेट छत्रपती संभाजीनगर येथे डिप्लोमा इन प्लास्टिक टेक्नॉलॉजी (ḍझढ), डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड टेक्नॉलॉजी (ḍझचढ), पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन प्लास्टिक प्रोसेसिंग अँड टेस्टिंग (झक्रृ-झझढ) तसेच पोस्ट डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड डिझाइन (झ्रृ-झचृ) हे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

या अभ्यासक्रमास जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे आवाहन सिपेटचे प्रशिक्षण प्रमुख आर. जीवन राम यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक ९३७३६८७९१५ किंवा ०२४०-२४७८३२२ वर संपर्क साधावा.

### बौद्ध समाजातील संस्थांसाठी 10 लाख रुपये अनुदान योजना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**नाझरे सुपे :** राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत व संस्थेमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा जास्त बौद्ध विश्वस्त, सदस्य असलेल्या बौद्ध समाजातील सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थांसाठी पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १० लाख रुपये अनुदान योजना राबविण्यात येणार आहे.

ही योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अंमलात आणण्यात येणार असून, पात्र व इच्छुक संस्थांनी शासनाच्या नमुन्यातील प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दिनांक २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. प्राप्त प्रस्तावांची छाननी करून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत ते शासनाकडे दिनांक ०६ मार्च २०२६ पर्यंत सादर करण्यात येणार आहेत. तरी पात्र संस्थांनी दिलेल्या मुदतीत प्रस्ताव सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन किरण इंदलकर, जिल्हा नियोजन अधिकारी तथा अल्पसंख्यांक अधिकारी यांनी केले आहे.

# राष्ट्रवादी कॉंग्रेसने चौदा पैकी आठ जागांवर विजय मिळवत केली सत्ता स्थापित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरुर :** नुकत्याच पार पडलेल्या शिरूर पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यात खूप चुरशीची लढत झाली. राष्ट्रवादी कॉं चौदा पैकी आठ जागांवर विजय मिळवत पंचायत समितीवर सत्ता प्रस्थापित केली.एक अपक्ष तर भाजपाचे पाच उमेदवार निवडून आले. तर दोन्ही शिवसेनेला खातेही उघडता आले नाही पंचायत समिती निवडणुकीचे पार्श्वभूमीवर अनेक उमेदवार पक्षांतर करत निवडणूक रिंगणामध्ये उमेदवारी दाखल केली होती. पक्षांतर करून अनेकांना यश ही मिळाले आहे.

या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोन्ही गट एकत्रित झाल्याने साहजिकच राष्ट्रवादी कॉंग्रेसची ताकद वाढली.तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली सहानभूती मुळे ही पक्षाच्या विजयात भर पडली. शिवसेना शिंदे पक्षाचे तालुकाध्यक्ष रामभाऊ सासवडे शिरूर ग्रामीण भाजपचे माजी सरपंच विठ्ठल घावटे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. सासवडे यांनी शिक्रापूर गणातून तर विठ्ठल घावटे यांच्या पत्नी स्वाती घावटे यांनी शिरूर ग्रामीण मधून निवडणूक लढवली व विजयी झाले. टाकळी हाजी व कवठे येमाई राष्ट्रवादी कॉंग्रेसचा बालेकिल्ला माजी आमदार पोपटराव गावडे यांचे चिरंजीव राजेंद्र गावडे यांच्या भाजप प्रवेशा मुळे उध्वस्त झाला. या ठिकाणी प्रथमच भाजपचे कमळ फुलले सुनिता कड व कांचन सांडभोर विजयी झाल्या.शिरूर ग्रामीण हा माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांचा बालेकिल्ला मानला जात होता. येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्वाती घावटे यांनी विजय मिळविला. तर न्हावरा पंचायत समिती गणातून ही राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दीपक पवार विजयी झाले. रांजणगाव गणपती पंचायती समिती गटात भाजपचे सागर देवकर यांनी बाजी मारली तर कारेगाव पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी कॉंग्रेस युवतीच्या पदाधिकारी माजी सरपंच निर्मला नवले यांना पराभवाचा सामना करावा लागला. या ठिकाणी भाजपाच्या उमेदवार माजी पंचायत समिती सदस्या मनीषा पाचंगे यांनी कमळ फुलवले.पाबळ पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवार व बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पवार यांच्या पत्नी वंदना पवार या विजयी झाल्या. तर केंदुर गणातून ही राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सुचेत्रा थिटे या विजयी झाल्या.

रांजणगाव सांडस व तळेगाव गणात अनुक्रमे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विजय रणसिंग व भाजपच्या विद्या राजेंद्र भुजबळ या विजयी झाल्या भाजपच्या भुजबळ यांनी राष्टवादी कॉंग्रेसचे नेते महेश ढमढेरे यांच्या पत्नी शोभा ढमढेरे यांना पराभूत केला.शिक्रापूर पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे रामभाऊ सासवडे तर सणसवाडी गणातून अपक्ष उमेदवार कोमल ढेरंगे विजयी झाल्या.

# भीमाशंकरच्या स्ट्रॉबेरीला शासनाचा आधार

## प्रशासनाच्या समन्वयातून शेतकरी आणि विद्यार्थ्यांना दुहेरी लाभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेल्या स्ट्रॉबेरीला यंदा शासन आणि प्रशासनाच्या योग्य वेळी मिळालेल्या आधारामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. घोडेगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय आणि आंबेगाव तालुका कृषी विभाग यांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या स्ट्रॉबेरीला हमी, बाजारपेठ मिळाली असून प्रति किलो १५५ रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. भीमाशंकर परिसरातील दुर्गम व डोंगराळ भागात यंदा १७८ शेतकऱ्यांनी स्ट्रॉबेरीची लागवड केली आहे. आदिवासी विकास विभागामार्फत प्रत्येक शेतकऱ्याला ५ गुंठे क्षेत्रासाठी सुमारे ४७ हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. मात्र, तीर्थक्षेत्रातील मंदिर काही काळ बंद राहिल्याने पर्यटकांची संख्या घटली आणि स्थानिक बाजारपेठ ठप्प झाली. परिणामी, नाशवंत असलेल्या स्ट्रॉबेरीच्या विक्रीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.

ही परिस्थिती लक्षात घेऊन एकात्मिमक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांच्या पुढाकारातून प्रकल्पांतर्गत कार्यरत मध्यवर्ती स्वयंपाकगृहामार्फत शेतकऱ्यांकडून थेट स्ट्रॉबेरी खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांचा माल थेट विकला जाऊ लागला असून आर्थिक नुकसान टळले आहे. विशेष म्हणजे, खरेदी करण्यात आलेली स्ट्रॉबेरी आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आहारात समाविष्ट करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळत असतानाच विद्यार्थ्यांना व्हिटॅमिन-सीयुक्त ताजी आणि पौष्टिक फळे मिळत आहेत.

दरम्यान, तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना आधुनिक लागवड तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, खत व्यवस्थापन तसेच काढणीपश्चात प्रक्रिया याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या तांत्रिक मार्गदर्शनामुळे आणि आर्थिक सहाय्यामुळे यंदा या भागातील स्ट्रॉबेरी उत्पादनाचा दर्जा आणि प्रमाण दोन्ही वाढले आहे.प्रशासनाच्या पाठबळामुळे या उपक्रमाला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून अनेक शेतकऱ्यांनी भविष्यात स्ट्रॉबेरी लागवड वाढवण्याचा निर्णय घेतला .

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भू-स्थानिक तंत्रज्ञानावर राष्ट्रीय परिषद संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :-** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगोल विभागात दिनांक ४ ते ६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान भू-स्थानिक तंत्रज्ञान आणि शाश्वत भूप्रदेश (Geospatial Technologies and Sustainable Landscapes) या विषयावर तीन दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमुळे शैक्षणिक अभ्यासक, उद्योग प्रतिनिधी आणि धोरणकर्ते यांच्यात अर्थपूर्ण संवादासाठी एक प्रभावी शैक्षणिक मंच उपलब्ध झाला.

या परिषदेस महाराष्ट्रासह देशभरातून सुमारे १७० भूगोल अभ्यासकांनी सहभाग घेतला. पहिल्या दिवशी उद्घाटन सत्रात डॉ. आर. पी. सिंग, संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रिमोट सेन्सिंग (Bgamo), देहरादून हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी इसरोमार्फत उपलब्ध असलेला भू-स्थानिक डेटा आणि देशाच्या विकासासाठी इसरोचे योगदान याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ए. सूर्यचंद्र राव, संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिओरोलॉजी (IITM²), पुणे होते. त्यांनी आपल्या भाषणात या क्षेत्रातील संधी आणि आव्हाने यावर प्रकाश टाकला.

याच उद्घाटन सत्रात परिषदेच्या विषयाशी संबंधित Application of Machine LeaA°ning in EaA°th Sciences (पृथ्वी विज्ञानातील मशीन लर्निंगचे उपयोजन) या स्प्रिंजर प्रकाशनाचे विद्यापीठातील प्राध्यापक व इतर अभ्यासकांनी संयुक्तरीत्या संपादित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

परिषदेच्या तीन दिवसांत भू-स्थानिक तंत्रज्ञान विश्लेषण, शाश्वत नियोजन, पर्यावरणीय लवचिकता तसेच समुदाय-आधारित संसाधन व्यवस्थापन या विषयांवर सखोल चर्चा झाली.

# सेंद्रिय शेती, जलसंवर्धन आणि महिला उद्योगातून ग्रामविकासाला नवे बळ

## सुयश चॅरिटेबल ट्रस्टचा अनोखा उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** दुर्गम व आदिवासी भागातील शेतकरी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शेतविषयक कार्यक्रमाचे आयोजन स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्र येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य सुहासराव हीरेमठ यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सुयश चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास, स्मिता घैसास तसेच कार्याध्यक्ष शलाका घैसास यांची प्रमुख उपस्थिती होती. या शेतविषयक संमेलनास भारतातील आठ राज्यांमधून आलेल्या आदिवासी शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

उद्घाटनप्रसंगी बोलताना सुहासराव हीरेमठ म्हणाले की, सुयश चॅरिटेबल ट्रस्ट गेल्या ४५ वर्षांपासून भारतातील आठ राज्यांमधील दुर्गम व आदिवासी भागांत सातत्याने उल्लेखनीय कार्य करत आहे. आजही अनेक गावांमध्ये वीज, नळाडरे पाणी, रस्ते तसेच मूलभूत सोयीसुविधांचा अभाव आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित व मागासलेल्या घटकांना पुढे आणणे अत्यंत गरजेचे असून या दिशेने ट्रस्टचे कार्य निश्चितच वाखाणण्याजोगे आहे. दुर्गम व जनजातीय भागातील

> सुयश चॅरिटेबल ट्रस्टमुळे आम्हाला नवे बळ मिळाले आहे. आमच्या दुर्गम भागात सेंद्रिय शेती करून आम्हाला रोजगार मिळाला असून आर्थिक समृद्धीही साधता आली आहे. शेतीत नवनवीन प्रयोग करत असून कडधान्ये, पालेभाज्या, फळे व फुलांचे विविध उत्पादन घेत आहोत.
>
> **- मिनू रेड्डी, उडिसा (आदिवासी शेतकरी)**

गावांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्थेने संवेदनशील आणि समाजाभिमुख कार्यपद्धती विकसित केली असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गेल्या ४५ वर्षांचा हा खडतर प्रवास असला तरी तो समाधानकारक आणि प्रेरणादायी ठरला आहे. भौगोलिक, भाषिक आणि जीवनशैलीतील विविधता लक्षात घेऊन संस्थेचे कार्यकर्ते प्रत्येक गावात प्रत्यक्ष जाऊन स्थानिक गरजांनुसार योजना राबवत आहेत. सेंद्रिय शेतीचा प्रसार, जैविक खत निर्मितीचे प्रशिक्षण, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन तसेच बंजर जमिनीवर सामूहिक शेती यावर विशेष भर दिला जात आहे. पशुखाद्य लागवड, कृषी शिक्षण व प्रशिक्षणामुळे शेतकरी शाश्वत शेतीकडे वळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. शलाका घैसास म्हणाल्या की, सुयशच्या माध्यमातून 'ग्राम यात्रा' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाडरे शहरातील नागरिकांना खेड्यातील जीवनाचा प्रत्यक्ष आणि स्वअनुभव घेता येणार आहे. 'ग्राम यात्रा' केवळ पर्यटनापुरती मर्यादित नसून, ती ग्रामीण जीवनशैली, संस्कृती आणि स्वावलंबनाचा जवळून अनुभव देणारी संकल्पना आहे. पर्यावरण-शेती पर्यटनाच्या माध्यमातून पर्यटकांना शेतकऱ्यांचे दैनंदिन जीवन, नैसर्गिक व मानवनिर्मित संसाधनांचा वापर, प्रक्रिया उद्योग, लोककला, हस्तकला आणि स्थानिक खाद्यसंस्कृती यांची सखोल ओळख होणार आहे. या उपक्रमामुळे स्थानिकांना रोजगारनिर्मितीची संधी मिळेल, महिलांना उद्यमशीलतेसाठी नवे व्यासपीठ उपलब्ध होईल आणि गावांच्या सर्वांगीण विकासाला नवे बळ मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.आजही अनेक दुर्गम गावांमध्ये वीज, शिक्षण आणि बाह्य संपर्काची कमतरता आहे. त्यामुळे अशा गावांचे 'गूगल पिन' नोंदवून त्यांचे अस्तित्व जागतिक पातळीवर दृश्यमान करण्याचा उपक्रम संस्थेने सुरू केला आहे. सेंद्रिय उत्पादनांवर आधारित गटशेती, महिला-केंद्रित हस्तनिर्मित उद्योग, पारंपरिक उत्पादनांचे ब्रँडिंग व पॅकेजिंग यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. संस्थेच्या अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली 'सबका साथ, सबका विकास' या विचारातून आदर्श गाव संकल्पना प्रभावीपणे राबवली जात आहे.

# आंबेगावमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादीचे वर्चस्व

## अटीतटीची लढत असलेल्या पारगाव - जारकरवाडी जिल्हा परिषद गटात विवेक वळसे पाटील विजयी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुका जिल्हा परिषद, पंचायत समितीचा निकाल मंगळवार दि. ९ रोजी जाहिर झाला असून आंबेगाव तालुक्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीत पुन्हा एकदा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आपले वर्चस्व सिद्ध केल्याचे पहावयास मिळत आहे. ५ जिल्हा परिषद व १० पंचायत समिती निवडणूक पैकी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ३, शिवसेना एक व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला एक असे उमेदवार निवडून आले आहे. तर पंचायत समिती निकालात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आठ, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षांचे दोन उमेदवार निवडून आले आहेत. पारगाव जारकरवाडी जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे विवेक वळसे पाटील २,८०७ मतांनी विजयी झाले त्यांनी एकूण १३,८०९ मते मिळवली त्यांच्या विरोधात शिवसेना (शिंदे) चे अरुण गिरे यांना ११,००२ मते मिळाली.

अवसरी बुद्रुक जिल्हा परिषद गटातून विष्णू काका हिंगे यांनी ६०५ मतांची आघाडी घेत १० हजार ८७८ मते मिळवत विजयी झाले. त्यांचें विरोधात राष्ट्रवादी (शरद पवार)चे प्रशांत अभंग यांना १०,२७३ मते मिळाली. शिनोली



गटातून शिला राजेंद्र लोहकरे यांनी १०,३६७ मते घेत ३,६४२ मतांनी विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील राष्ट्रवादी (शरद पवार) च्या सरिता माळी यांना ६,७२५ मते मिळाली. घोडेगाव गटात शिवसेना (शिंदेगटाच्या) च्या सुवर्णा दरेकर ११,६७४ मतांसह ३०६ मतांनी विजयी झाल्या. त्याच्या विरोधात राष्ट्रवादी (अजित पवार)च्या मंगल हुले यांना ११,३६८ मते मिळाली.

कळंब गटात राष्ट्रवादी (शरद पवार)च्या प्रीती थोरात १४,१११ मतांसह १,५६१ मतांनी विजयी झाल्या. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी च्या तुलसी भोर यांना १२,५५० मते मिळाली पंचायत समिती शिनोली गणात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ज्योती पारधी २१४७ मतांनी विजयी झाले त्यांना ५,७८२ मते मिळाली त्याच्या विरोधात राष्ट्रवादी (शरद पवार) - सुरेखा गभाले ३,६३५ यांना मते मिळाली.बोरघर पंचायत समिती गणात राष्ट्रवादी (अजित पवार) संजय गवारी १७४५ च्या मताधिक्याने निवडून आले त्यांना ४,८५२ मते मिळाली त्यांच्याविरोधात कम्युनिस्ट पक्षाचे राजेंद्र घोडे यांना ३,१०७ मते मिळाली. पेठ गणात राष्ट्रवादी (अजित पवार) - संजय पवळे १५९५ च्या मताधिक्याने निवडून आले त्यांना ४,७२२ मते मिळाली त्यांच्याविरोधात शिवसेना (उद्धव ठाकरे पक्षाचे अंकुश लांडे यांना ३,१२७ मते मिळाली.घोडेगाव गणात राष्ट्रवादी पक्षाचे कैलास काळे १८५३ मतांनी निवडून आले त्यांना ७,७०९ मते मिळाली. त्यांच्याविरोधात शिवसेना (शिंदे) - कपिल काळे यांना ५,८५६ मते मिळाली. कळंब गनात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उषा कानडे ३०५४ मतांनी निवडून आल्या त्यांना ७,८४९ मते मिळाली त्यांच्याविरोधात शिवसेना (उद्धव ठाकरे पक्षाच्या राजश्री भालेराव यांना ४,७९५ मते मिळाली. चांडोली गणात राष्ट्रवादी (शरद पवार) - प्रियांका वाघ १४१२ मतांनी निवडून आल्या त्यांना ७,४५२ मतदान झाले.

तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या सीमा खिलारी यांना ६,०४० मते मिळाली.जारकरवाडी गणात राष्ट्राादी (अजित पवार) पक्षाच्या अंकिता वाळुंज ५४८ फरकाने निवडून आल्या त्यांना ६,७४६ मते मिळाली त्यांच्याविरोधात शिवसेना (उद्धव ठाकरे पक्षाच्या रोहिणी वाळुंज यांना ६,१९८ मते मिळाली. पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक गणात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या श्वेता ढोबळे या ५४२ च्या फरकाने निवडून आल्या त्यांना ६,१७० मते मिळाली त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या सुनंदा ढोबळे यांना ५,६२९ मते मिळाली. अवसरी बुद्रुक गणात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे निलेश टेमकर हे २५७७ मताधिक्याने निवडून आले त्यांना ५,७०४ मते मिळाली त्यांच्याविरोधात भाजपचे अनिकेत भोर यांना ३,१२७ मते मिळाली.

पिंपळगाव तर्फे महाळुंगे गणात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाची शिवाजी निघोट हे ४५६ मतांनी निवडून आले त्यांना ५,१६१ मते मिळाली त्यांच्या विरोधात शिवसेना (शिंदे) पक्षाचे मनोहर इंदोरे यांना ४,७०५ मते मिळाली.

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीतही घराणेशाहीचा डंका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचा निकाल लागला. अपेक्षेप्रमाणे यादेखील निवडणुकीत भाजप राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरला. भाजपच्या विजयाबरोबरच या निकालांमुळे 'घराणेशाही'ची चर्चा पुन्हा रंगली. एकीकडे जनता विकासाच्या राजकारणाला पाठिंबा देत असल्याचे दिसते, तर दुसरीकडे काही ठिकाणी कौटुंबिक राजकारणाचा प्रभाव कायम राहिल्याचे चित्र आहे. महायुतीच्या या विजयाला 'ग्रामीण महाराष्ट्राने विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवला' असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.




राज्यातील १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. भारतीय जनता पक्ष (भाजप) पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, भाजपने २०१७ च्या रेकॉर्डला मोडून २३६ जिल्हा परिषद जागा व ४१० पंचायत समिती जागा जिंकल्या आहेत. महायुतीने सर्व १२ जिल्ह्यांमध्ये विजय मिळवला असून, भाजप सात जिल्हा परिषदांमध्ये (छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सोलापूर, सांगली, धाराशिव, परभणी, सातारा) सर्वात मोठा पक्ष ठरला.पश्चिम महाराष्ट्र (पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर) व मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर) मधील दिग्गज नेत्यांच्या नातेवाईकांनी या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात उडी घेतली. यात काहींनी बाजी मारली, तर काहींना मतदारांनी नाकारले.

### विजयी नातेवाईक :

**कोल्हापूर :** भाजप आमदार राहुल आवाडे यांची कन्या सानिका आवाडे विजयी (चौथ्या पिढीतील प्रवेश).
**सांगली :** कॉंग्रेस आमदार विश्वजित कदम यांचा भाचा ऋषिकेश लाड विजयी.
**सांगली :** माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांची सून मोहिनी खोत विजयी.
**धाराशिव :** भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील विजयी.
**छत्रपती संभाजीनगर :** खासदार संदीपान भुमरे यांचा पुतण्या शिवराज भुमरे विजयी.
**सोलापूर :** आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची पत्नी शांभवी व बंधू सागर विजयी.

### पराभूत नातेवाईक :

**सातारा :** पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे बंधू अरुण गोरे व भावजय भारती गोरे पराभूत.
**लातूर :** माजी आमदार त्र्यंबक भिसे यांची भावजय सरिता भिसे पराभूत.
**परभणी :** माजी मंत्री सुरेश वरपूडकर यांच्या कुटुंबातील चार जण (मुलगा, मुलगी, सून) पराभूत.
**माळशिरस :** आमदार उत्तम जानकर यांचा पुत्र जीवन जानकर पराभूत.




# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा आज वर्धापन दिन समारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ७७ वा वर्धापन दिन मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या इरावती कर्वे सामाजिक शास्त्र संकुलातील स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृह, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

सदर वर्धापन दिन समारंभाच्या प्रथम सत्रात 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहेत. या सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ व नॅशनल रिसर्च प्रोफेसर मा. डॉ. रघुनाथ माशेलकर हे उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी हे राहणार आहेत. समारंभाच्या दुपारच्या सत्रात पुरस्कारप्राप्त व्यक्ती तसेच महाविद्यालये व परिसंस्थांचा गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये युवा गौरव पुरस्कार तसेच उत्कृष्ट महाविद्यालय व उत्कृष्ट परिसंस्था पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. या प्रसंगी मा. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, प्रभारी कुलसचिव तथा वित्त व लेखाधिकारी सीएमए डॉ. चारुशीला गायके तसेच अन्य मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर (webcast.unipune.ac.in) करण्यात येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७७ वर्षांच्या शैक्षणिक, संशोधनात्मक व सामाजिक योगदानाचा गौरव करणारा हा वर्धापन दिन समारंभ साजरा करण्यात येणार असून, विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालये व परिसंस्थांचे प्राचार्य व संचालक, पुरस्कारप्राप्त संस्था व व्यक्ती, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती असणार आहे.

# जामखेड तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतींवर प्रशासकराज

## गटविकास अधिकारी शुभम जाधव यांचे आदेश

तालुका प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यात पाच वर्षांची मुदत पूर्ण झालेल्या तसेच जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या एकूण ४७ ग्रामपंचायतींची मुदत फेब्रुवारी २०२६ मध्ये संपत असल्याने या सर्व ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नेमणूक करण्यात आली आहे. यानुसार काही ग्रामपंचायतींवर दि. ९ फेब्रुवारी तर उर्वरित ग्रामपंचायतींवर दि. १० फेब्रुवारी २०२६ पासून प्रशासक कार्यभार स्वीकारणार आहेत. याबाबतचे आदेश जामखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभम जाधव यांनी विविध शासन निर्णय व आदेशांच्या आधारे निर्गमित केले आहेत.

या आदेशानुसार जामखेड तालुक्यातील ४७ ग्राम पंचायतींवर प्रशासन म्हणून विविध विभागांतील अधिकारी




व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये विस्तार अधिकारी (कृषी, पंचायत, शिक्षण), शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, पर्यवेक्षक, केंद्रप्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक आदी पदांवरील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. संबंधित अधिकाऱ्यांना आघी, आनंदवाडी, आपटी, अरणगाव, बांधखडक, बाळगव्हाण, बावी, बोर्ले, चोंडी, चोभेवाडी, डोणगाव, दिघोळ, देवदैठण, धानोरा, धामणगाव, धोंडपारगाव, गुरेवाडी, घोडेगाव, जवळके, जातेगाव, जायभायवाडी, कवडगाव, कुसडगाव, खर्डा, खांडवी, खुरदैठण, लोणी, मोहरी, मोहा, नान्नज, नायगाव, नाहुली, पाटोदा, पडळी, पिंपरखेड, पिंपळगाव आळवा, पिंपळगाव उंडा, पोतेवाडी, राजेवाडी, सारोळा, सातेफळ, सावरगाव, सोनेगाव, तरडगाव, तेलंगशी, वाघा व झिक्री आदी ग्राम पंचायतींचा प्रशासकीय कार्यभार सोपविण्यात आला आहे.

संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मूळ पदाचा कार्यभार सांभाळून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९, महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता २०११ तसेच शासन निर्णय व परिपत्रकांतील तरतुदीनुसार प्रशासक म्हणून कामकाज करावे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. कर्तव्यात कसूर, दुर्लक्ष अथवा गैरवर्तन आढळल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही गटविकास अधिकारी शुभम जाधव यांनी दिला आहे.

# ‘लाडक्या बहिणीं’कडून महादेवाला अभिषेक

## उपमुख्यमंत्री शिंदेंना दीर्घायुष्यासाठी सामुहिक प्रार्थना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेवगाव तालुक्यातील ’लाडक्या बहिणीं’नी माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडेंच्या पुढाकाराने एकत्रित येत तालुक्याचे धाकटे शिखर शिंगणापूर असलेल्या माळेगावच्या महादेव मंदिरातील भगवान महादेवाला अभिषेक घालून दीर्घायुष्यासाठी साकडे घातले.

यावेळी माजी जि.प सदस्या हर्षदा काकडे, विमल सातपुते, देवडे नानी, रुक्मणी रुईकर, पद्मा भापकर, साखरबाई औटी, नंदा लोंढे, सुनंदा औटी, मीना ढाकणे, केशर बोडखे, मीनाताई डावरे, मालन लबडे, सुभद्रा बोडखे, कलाबाई घोरपडे, सुमन घोरपडे, सुनिता ढाकणे, स्वाती धायगुंडे, सुमन गावडे, नंदा गावडे, मनीषा भालेराव यांचेसह शेकडो महिला उपस्थित होत्या.



यावेळी बोलताना काकडे म्हणाल्या की, नुकतेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दुर्दैवी निधन झाल्याने शिंदे साहेबांचा वाढदिवस साजरा करण्याचे कुठलेही नियोजन नव्हते. परंतु आपल्या बहिणीं’चे लाडके भाऊ ना. शिंदे साहेबांना दीर्घ दीर्घायुष्य लाभावे या हेतूने सर्वांनी एकत्रित येत सोमवारच्या पार्श्वभूमीवर महादेवाच्या मंदिरात अभिषेक व जप केला.

तालुक्याच्या पूर्व भागातील विविध गावांसाठी ताजनापुर लिफ्टचे पाणी मिळावे याकरिता चापडगावला पाणी चाचणी झालेली असुन उर्वरित गावांसाठीची पाणी चाचणी घेण्यात यावी. माळेगाव-ने व परिसरातील गावातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी द्यावे तसेच वरूर-आखेगावसह १३ गावांच्या पाणी योजनेसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, माळेगाव-ने च्या महादेव मंदिरासाठी सभामंडप व इतर देवस्थान सुविधेसाठी निधी मिळावा मागण्यांच्या पुर्ततेसाठी ना. शिंदे यांना साकडे घालणार आहोत.

यावेळी ॲड. शिवाजी काकडे, जगन्नाथ गावडे, नामदेव ढाकणे, रामकिसन घनवट, राजेंद्र भिसे, रामजी पोटफोडे, सुनील दारकुंडे , एकनाथ ढाकणे, वीर भाऊसाहेब, सरपंच रामनाथ भालेराव यांचेसह परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सर्वांना फराळ वाटप करून या कार्यक्रमाचा समारोप झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगन्नाथ गावडे यांनी तर आभार देवस्थानचे अध्यक्ष बाबासाहेब वाकडे यांनी मानले.

# बाबुर्डी बेद ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## गौण खनिज उत्खनन तात्काळ बंद करण्याची मागणी




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** बाबुर्डी बेद येथील गावामध्ये सुरू असलेल्या गौण खनिज उत्खननाच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत तात्काळ कारवाईची मागणी केली. शेती व शेतीपूरक व्यवसाय हेच गावकऱ्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन असल्याने उत्खननामुळे त्यांच्या जीवनावर गंभीर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गट क्र. ३१, ३६ व ३७ मधील खाणींमध्ये डबल उत्खनन व बोर ब्लास्टिंगचे काम सुरू असून ते अनेकदा रात्री अपरात्रीही केले जाते. या स्फोटांमुळे मोठमोठे आवाज होतात, दगड उडतात आणि परिसरात मोठ्या प्रमाणात धूळ पसरते. परिणामी जवळच असलेल्या वस्त्यांमधील पत्र्याची घरे व गोठे हादरतात आणि त्यांना नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.

याशिवाय, बोर ब्लास्टिंगमुळे काही बोरवेल व विहिरींचे पाणी आटले असून उर्वरित पाणीही जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जनावरांच्या दुधाच्या उत्पादनात घट झाली असून पशुपक्ष्यांच्या तसेच नागरिकांच्या जीवितासही धोका निर्माण झाला आहे. सततच्या उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचीही ग्रामस्थांनी तक्रार केली आहे.

या संदर्भात यापूर्वीही प्रशासनाकडे अनेक वेळा अर्ज देण्यात आले, मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. भविष्यात या खाणींमुळे गावात कोणतीही जीवित किंवा प्राणीहानी झाल्यास त्यास प्रशासन, बाबुर्डी बेदचे सरपंच, ग्रामसेवक व सदस्य जबाबदार राहतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला. डबर खाणी तात्काळ बंद करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

# शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यावर बिबट्याचा हल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** तालुक्यातील म्हसे गावच्या भांबवाडी परिसरात बिबट्याने थेट शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यावर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली असून, या हल्ल्यात काळू छबु निकम (वय ३८) हे गंभीर जखमी झाले आहेत. घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काळू निकम हे म्हसे गावच्या भांबवाडी शिवारात शेतकाम करत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घातली. बिबट्याच्या हल्ल्यात त्यांच्या हात, पाय व अंगावर जखमा झाल्या असून, स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदत करून त्यांना उपचारासाठी शिरूर येथील खाजगी रुग्णालयात, त्यानंतर पुढील उपचारासाठी सिव्हिल रुग्णालयात दाखल केले आहे.

**वनविभाग घटनास्थळी :** घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, परिसराची पाहणी करून अधिक तपशील घेण्याचे काम सुरू आहे. बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीती पसरली आहे.

**शेतकऱ्यांमध्ये दहशत :** भांबवाडी व लगतच्या परिसरात यापूर्वीही वन्यप्राण्यांचा वावर आढळून आला असल्याने, बिबट्याला तात्काळ जेरबंद करावे, पिंजरा लावावा आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

**शेतात काम करायचं की जीव वाचवायचा?**

श्रीगोंदयात बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांमुळे तालुक्यातील शेतकरी अस्वस्थ झाले आहेत. त्यामुळे शेतात काम करायचं की जीव वाचवायचा? असा प्रश्न शेतकऱ्यांच्या समोर उभा राहिला आहे.

# पेमगिरीमध्ये विविध विकास कामांचे लोकार्पण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** स्वराज्य संकल्पकाची भूमी असलेल्या पेमगिरी येथील शहागडासह विविध विकास कामांसाठी आपण सातत्याने निधी दिला. त्या निधीमधून राबवलेल्या विविध विकास कामे पेमगिरी हे आदर्श गाव ठरले असून निळवंडे कालव्याच्या वरील भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळाले पाहिजे अशी आग्रही मागणी निळवंडे धरण व कालव्यांचे निर्माते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे याचबरोबर पेमगिरी गावांमध्ये ३ कोटी २८ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचा लोकार्पण त्यांनी केला.

पेमगिरी येथे पेमगिरी शहागड तटबंदीचे बांधकाम, ग्राम पंचायत कार्यालय इमारत, शाळांच्या वर्ग खोल्या, सभागृह ,पूल ,अंगणवाडी इमारत, सौर दिवे, सोलर प्रकल्प व अभ्यासिकेचे लोकार्पण माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते या प्रसंगी अध्यक्षस्थानी माआमदार डॉ.सुधीर तांबे हे होते तर व्यासपीठावर ड माधवराव कानवडे, पांडुरंग पाटील घुले, रामहरी कातोरे, संपतराव डोंगरे, अजय फटांगरे, सोमनाथ गोडसे रावसाहेब डूबे ,शांताराम डूबे, सरपंच द्वारकाबाई डूबे, उपसरपंच शालन चव्हाण, बाळासाहेब मस्के प्रतापराव डूबे विलास कवडे, रमेश गुंजाळ, संतोष मांडेकर, विनोद हासे, मनीष गोपाळे, भास्कर गोपाळे, दीपक कानवडे, मारुती कवडे यांच्यासह गावातील विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की पेमगिरी गावच्या विकासासाठी आपण सातत्याने निधी दिला मोरदरा धरण ते गावातील विकास काम हे गावच्या विकासात अत्यंत महत्त्वाची ठरली आहेत. याचबरोबर ऐतिहासिक शहागड व महाकाय वटवृक्षाच्या विकासासाठी ही आपण निधी दिला. सध्या शासन घोषणा करते मात्र त्यांच्याकडे निधीची कमतरता आहे.

जिल्हा परिषदेची शाळांमधून विद्यार्थ्यांना अत्यंत चांगले शिक्षण दिले जात असून अनेक शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे आपण शिक्षण मंत्री असताना शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला मात्र सध्या सरकारचे धोरण उदासीन आहे. पेमगिरी गावातील महिलांनी बचत गटातून मोठे संघटन केले असून महिलांना काँग्रेसने आरक्षण दिले आहे महिलांच्या विकासासाठी सातत्याने काम केले आहे.

निळवंडे धरण व कालवे आपण पूर्ण केले असून कालव्याच्या वरच्या भागाला पाणी देण्याची सुद्धा नियोजन केले होते. कालव्याच्या वरील भागातील शेतकऱ्यांना सुद्धा पाणी तातडीने द्यावी अशी मागणी त्यांनी केली असून ४० वर्षात हा संगमनेर तालुका उभा केला यामध्ये जनतेची मोठी साथ मिळाली. सतत विकास कामांमुळे आज संगमनेर तालुका राज्यात अग्रगण्य ठरला असल्याचे ते म्हणाले.

तर माजी आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी अथक प्रयत्नातून तालुका उभा केला. आज संगमनेर तालुका सहकार शिक्षण समाजकारण शेती अशा सर्व क्षेत्रात राज्याला दिशादर्शक आहे. हे काम एका दिवसात नव्हे तर ४० वर्षातील परिश्रमाचे फळ आहे. हा तालुका आपल्याला जपायचा असून सर्वांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोमनाथ गोडसे यांनी केले तर शांताराम डूबे यांनी आभार मानले यावेळी गावातील युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मैदानी खेळ हे सर्वात प्रभावी मेडिटेशन : सोमनाथ घार्गे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर :** मैदान हे असे ठिकाण आहे की जिथे सर्व ताणतणाव विसरून प्रत्येक जण खेळावर लक्ष केंद्रीत करुन खेळाचा आनंद घेतो. अनेकदा एका कार्यालयात काम करूनही आपसात तितका संवाद नसतो. मैदानात मात्र एकत्र येवून संवाद साधावा लागतो. एकत्र खेळताना अधिकारी, कर्मचारी यांच्यातील अंतर कमी होते. प्रत्येकाने खेळाकडे गांभीर्याने पहायला हवे. कारण खेळाइतके चांगले मेडिटेशन नाही. ते शरीर व मनाला ऊर्जा देते. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. हे कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्यावतीने अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचा समारोप पारितोषिक वितरण समारंभाने झाला. क्रीडा स्पर्धेत संगमनेर पंचायत समितीने प्रथम क्रमांकासह




जनरल चॅम्पियनशिप मिळवली. अकोले पंचायत समितीला व्दितीय क्रमांक मिळाला. बक्षिस वितरण कार्यक्रमास पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, डॉ.स्मिता भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, दादाभाऊ गुंजाळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, संध्या गायकवाड, सुधीर शिंदे, शिवम डपकर आदींसह जिल्ह्यातील गट विकास अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द•ख•ल

### राज्य संघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी शरद नागरगोजे



**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य नगरपालिका महानगरपालिका शिक्षक संघाच्या राज्य प्रसिद्धी प्रमुख पदी श्रीरामपूर नगरपालिका शाळा क्रं. ८ चे तंत्रस्नेही शिक्षक शरद नागरगोजे यांची निवड करण्यात आली. निवडीचे पत्र राज्य संघाचे अध्यक्ष अर्जून कोळी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली. या निवडीचे स्वागत लोकनियुक्त नगराध्यक्ष करण ससाणे, उपनगराध्यक्ष कांचनताई सानप, प्रशासनाधिकारी संजीवन दिवे,सरचिटणीस अरुण पवार, राज्य सल्लागार नवनाथ अकोलकर भाऊसाहेब कबाडी, सुनील रहाणे,सचीन शिंदे,अजय धाकतोडे, बापूसाहेब तांबे, ताराचंद पगारे, विजय शेळके, शिवाजी भालेराव, आदिंनी अभिनंदन केले.

### नागेबाबा मल्टीस्टेट कोल्हार शाखेचा १५ वा वर्धापनदिन संपन्न

**कोल्हार :** श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को ऑप अर्बन क्रेडिट सोसायटी लि अहिल्यानगरच्या कोल्हार शाखेचा १५ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी शाखेचे सभासद बाबासाहेब साबळे यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. संस्थेचे संस्थापक चेअरमन कडूभाऊ काळे यांनी याप्रसंगी खातेदार सभासदांसोबत हितगुज करत विविध विषयांवर चर्चा केली सभासद, खातेदार आणि कर्मचाऱ्यांच्या विश्वासामुळेच संस्थेने आर्थिक स्थैर्य व प्रगती साधल्याचे चेअरमन कडूभाऊ काळे यांनी सांगितले. उपस्थित सर्व सभासद ,खातेदार यांनी संस्थेच्या सामाजिक व आर्थिक योगदानाचे कौतुक करून भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास शाखेतील सर्व सभासद, खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी शाखा समन्वयक यशवंत मिसाळ, एरिया डेव्हलपमेंट ऑफिसर प्रशांत रासकर, शाखाधिकारी महेश मोहिते, नंदा चिंधे, अशोक दुशिंग, स्नेहल जाधव, कैलास चोखर आदींचे सहकार्य लाभले.

### कृष्ण कथा पाप दैन्य घालवणारी : हभप राम महाराज



**शेवगाव :** भारत भूमीमध्ये देव देवतांच्या संत महापुरुषांच्या वास्तव्याने पुनीत झालेला भूमीला तीर्थक्षेत्रत्व प्राप्त आहे. त्या ठिकाणची यात्रा आयुष्यात एकदा तरी करणं हे महान पुण्य प्राप्त करून देणारे असते. त्यानुसार ह भ प श्री राम महाराज आखेगावकर हे प्रत्येक वर्षी अशा क्षेत्रावर ट्रॅव्हल्स द्वारे यात्रेचे आयोजन करत असतात. यावर्षी द्वारका धाम यात्रा आयोजित करून तीन दिवस श्रीकृष्ण कथा अर्थात द्वारका महिमा कथा संपन्न झाली. त्याप्रसंगी महाराज बोलत होते. यानिमित्ताने टाळ मृदंगाच्या गजरात ग्रंथ मिरवणूक,द्वारका नगरीची प्रदक्षिणा, समुद्र स्नान, अन्नदान इत्यादी उपक्रम संपन्न झाले. एकंदर दहा दिवसाचा प्रवास होऊन सोरटी सोमनाथ, गिरनार पर्वत दत्त दर्शन, मूळ द्वारका, बेट द्वारका, सुदामपुरी ,डाकुर सप्तशृंगी, नाशिक ,त्रंबकेश्वर इत्यादी पवित्र स्थानांचे दर्शनही भाविकांनी घेतले. हरिनाम घेत घेत सामुदायिक पद्धतीने सर्व मंडळी स्वयंपाक करून सामुदायिक भोजन करत असत. तीर्थयात्रेमध्ये आधिक्याने सर्व भाविकांनी नामस्मरण केले हे विशेष. या यात्रेमध्ये आखेगाव सुसरे हिंगणगाव देवटाकळी बेलगाव येथील भाविक सहभागी झाले होते. संभाजी शिंदे चोपदार , योगेश जाधव, गणेश काटे इत्यादिंनी सर्व यात्रेचे व्यवस्थित नियोजन केले.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

मंगळवार, दि.१० फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## धक्काबुक्की करत जीवे ठार मारण्याची धमकी

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर येथील न्यायालयाच्या बाहेर चहा पिण्यासाठी आलो असता त्याठिकाणी अशोकनगर येथील एकाने येऊन काहीही कारण नसताना धक्काबुक्की केली. धक्का बुक्की का करता असे विचारले असतो तुझा पायच काढून टाकतो आणि जीवे ठार करू अशी धमकी दिली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
राहाता तालुक्यातील विठ्ठल बहिणाजी विघावे यांचे श्रीरामपूर न्यायालयात वाद सुरू असून त्यासाठी काल न्यायालयात आलो असता मध्यंतरीच्या काळात चहा पिण्यासाठी बाहेर आले असता त्याचवेळी अशोकनगर येथील नवशीरम एकनर हा तेथे आला व काहीही कारण नसताना त्याने धक्का बुक्की केली. धक्का बुक्की का करता असे विचारले असता त्याने शिवीगाळ करून तुझा पाय तोडून टाकून व जीवे ठार मारून टाकीन अशी धमकी दिली. याप्रकारणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ७० क्युसेसच्या माऱ्याने वांबोरी चारी फुटली

## शेकडो हेक्टरवरील उभी पिके पाण्यात ! शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान !!



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी : वांबोरी चारीला सुरू असलेल्या अंदाजे ७० क्युसेस क्षमतेच्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे काल सोमवारी दिनांक ९ फेब्रुवारी रोजी दुपारी बाराच्या सुमारास मोठी दुर्घटना घडली. धामोरी स्टेशन परिसरात वांबोरी चारी अचानक फुटल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. काही क्षणांतच चारीतील पाणी ओढ्याच्या दिशेने धाव घेत थेट देव नदीकडे वाहू लागले आणि शेकडो हेक्टरवरील उभी पिके पाण्याखाली गेली.**

चारी फुटण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले, तरी दीर्घकाळ सुरू असलेल्या जोरदार पाण्याच्या प्रवाहामुळे चारीतील पाईप फुटल्याचा प्राथमिक अंदाज वांबोरी चारीचे शाखा अभियंता अक्षय कराळे यांनी व्यक्त केला आहे. वांबोरी चारीच्या माध्यमातून तब्बल ३ हजार ५६८ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येते. त्यामुळे या दुर्घटनेचा फटका मोठ्या परिसरातील शेतकऱ्यांना बसला आहे. वांबोरी चारी बुधवार, दि. ४ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आली होती. मात्र, सातत्याने वाढत गेलेल्या पाण्याच्या दाबामुळे सोमवारी अचानक चारी फुटल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिल्यानंतर कालवा निरीक्षकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

चारी फुटलेल्या ठिकाणी मोठा ओढा असल्याने पाणी वेगाने वाहून गेले आणि आजूबाजूच्या शेतांमध्ये अक्षरशः पूरसदृश स्थिती निर्माण झाली. या घटनेमुळे तयार अवस्थेतील पिके, उस, भाजीपाला व इतर नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अनेक शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देणारा शेतकरी या अनपेक्षित संकटाने पूर्णपणे हवालदिल झाला आहे. चारी फुटीमुळे सिंचन व्यवस्थेच्या देखभाल-दुरुस्तीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस नियोजन आणि नियमित तपासणीची गरज असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत.

### शेतकऱ्याची संतप्त प्रतिक्रिया

अचानक चारी फुटल्याने काही कळायच्या आत सगळं वाहून गेलं. उभी पिके डोळ्यांसमोर बुडताना पाहण्याशिवाय काहीच करू शकलो नाही. आधीच कर्जाचा डोंगर आहे, आता पुन्हा उभं कसं राहायचं? प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, नाहीतर शेतकरी संपेल, अशी व्यथा एका शेतकऱ्याने व्यक्त केली.




# मागणी असतानाही स्टॉल ओसाड!

## स्टॉल नोंदणीची औपचारिकता? कृषीपर्व-साईज्योतीवर प्रश्नचिन्ह

**करण नवले । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कृषीपर्व आणि साईज्योती सरस या दोन महत्त्वाच्या प्रदर्शनांमध्ये यंदा मोठ्या प्रमाणावर स्टॉल रिकामे राहिल्याचे चित्र पाहायला मिळाले. एकीकडे जिल्ह्यातील असंख्य महिला बचत गट, एकल महिला, सामाजिक संघटना आणि लघुउद्योजक स्टॉल मिळावेत म्हणून सातत्याने मागणी करत असताना, दुसरीकडे अनेक स्टॉल रिकामे ठेवण्यात आल्याने गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

या दोन्ही प्रदर्शनांचा उद्देश महिला बचत गटांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, स्थानिक उत्पादकांना व्यासपीठ देणे आणि ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेला चालना देणे हा आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक स्टॉल रिकामे राहिल्यामुळे हा उद्देशच फोल ठरल्याची भावना संबंधित घटकांकडून व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील अनेक बचत गटांनी वेळेत अर्ज करूनही त्यांना स्टॉल न मिळाल्याची तक्रार केली आहे. काही सामाजिक संघटनांनीही हस्तकला, कृषीपूरक उत्पादने, पर्यावरणपूरक वस्तू आणि स्वयंसहायता उपक्रमांचे स्टॉल उभारण्यासाठी मागणी केली होती. मात्र, या मागण्यांकडे दुर्लक्ष करून स्टॉल रिकामे का ठेवण्यात आले? असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, स्टॉल रिकामे राहिल्यामुळे प्रदर्शनाच्या एकूण आकर्षणावर आणि नागरिकांच्या प्रतिसादावर मोठा परिणाम झाला. रिकाम्या जागांमुळे प्रदर्शनाचा परिसर ओसाड भासला, तर सहभागी स्टॉलधारकांच्या व्यवसायावरही विपरीत परिणाम झाला. अनेक बचत गट महिलांनी अपेक्षित विक्री झाली नसल्याची खंत व्यक्त केली आहे. दरम्यान, स्टॉल वाटप करताना पारदर्शकता न राखल्याचा आरोपही पुढे येत आहे. काही मोजक्या गटांना आणि संस्थांना प्राधान्य देण्यात आल्याची चर्चा असून, अनेक पात्र घटकांना डावलण्यात आल्याची भावना आहे. त्यामुळे स्टॉल वाटप प्रक्रियेची सखोल चौकशी करून निकष, यादी आणि निर्णयप्रक्रिया सार्वजनिक करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणात जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि ग्रामीण विकास यंत्रणेने खुलासा करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते, महिला संघटना आणि नागरिकांकडून होत आहे. स्टॉल उपलब्ध असूनही ते रिकामे ठेवणे म्हणजे सार्वजनिक निधीचा अपव्यय आणि संधींचा अपमान, अशी टीकाही केली जात आहे.

याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी कठोर नियोजन, पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. 'कृषीपर्व' आणि 'साईज्योती सरस'सारख्या उपक्रमांकडून जिल्ह्यातील महिला, शेतकरी आणि लघुउद्योजकांना मोठ्या अपेक्षा असतात. मात्र, स्टॉल रिकामे राहण्याच्या प्रकारामुळे या अपेक्षांनाच तडा गेला आहे. आता या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणार का, आणि जबाबदारांवर कारवाई होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## श्रीरामपुरात चारचाकीची काच फोडून गाडीचे सुट्टे पार्ट चोरले!

**श्रीरामपूर :** शहरात घरासमोर उभी केलेली चारचाकी गाडीची काच फोडून अज्ञात चोरट्याने गाडीत घुसून गाडीत असलेले महत्त्वाचे सुटे भाग आणि इतर साहित्य चोरून नेले. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील मोरगेवस्ती, जनता हायस्कूलच्या मागे राहत असलेले आंबादास भिकाजी उदमले (वय ५४) यांनी त्यांची मारुती सुझुकी कंपनीची वॅगनआर गाडी (क्र. एमएच १७ बीवाय ५६८३) दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास राहत्या घरासमोर उभी केली होती. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्याने गाडीच्या डाव्या बाजूच्या मागील दरवाजाची काच फोडून आत प्रवेश केला.

चोरट्याने गाडीतील ६ हजार रुपये किमतीचे सीएनजी किट, १ हजार रुपये किमतीचा जॅक व स्टेपनी आणि ५०० रुपये किमतीचा ओप्पो कंपनीचा टायर असा एकूण ७ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आंबादास उदमले यांनी यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा रजिस्टर नंबर ८५/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३२४ (४), ३०५ (ब) प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक आर. के. भरत करत आहेत.

## शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने वीज नसल्याने

# उपकेंद्रावर माजी मंत्री तनपुरे यांच्यासह शेतकऱ्यांचे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी :** वांबोरी व परिसरात सोलर पॉइंट उपलब्ध असतानाही शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेची वीज मिळत नसल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. सध्या केवळ दोन तासच वीजपुरवठा होत असून त्यामुळे शेतीची कामे पूर्णतः ठप्प झाली आहेत. या पार्श्वभूमीवर संतप्त शेतकऱ्यांनी वांबोरी येथील वीज उपकेंद्रावर आंदोलन केले.

यावेळी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी संबंधित वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांच्या मागण्या मांडल्या. सोलर पॉइंट असूनही शेतकऱ्यांना पुरेशी वीज न मिळणे ही गंभीर बाब असून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

तीन दिवसांच्या आत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास वांबोरी येथे चक्काजाम आंदोलन छेडण्यात येईल, असा कडक इशारा माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी यावेळी दिला. शेतकऱ्यांच्या संयमाची परीक्षा घेऊ नये, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शेतकरी सेनेचे रविंद्र मोरे, शाम पटारे, बाबासाहेब भिटे, ऋषिकेश मोरे, किसन जवरे, कृष्णा पटारे, बाबासाहेब सोनवणे, संदीप निकम,गोटीराम मोरे, विशाल पारख, महेश साळुंके,सुरज शर्मा, अशोक पटारे, महेश पागिरे, भाऊ रहाणे, योगेश राऊत, नारायण हुळुले, नितिन नवले,आदिनाथ मोरे, भिमा मांगुडे ,सचिन गडाख, बाबुराव गांधले, रविकिरण पटारे, नारायण मोरे,सुरज मकासरे यांच्या सह वांबोरी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने यामधे सहभागी झाले होते.

## किरकोळ कारणावरून एकाचा खून, दूसरा गंभीर

**शेवगाव :** येथील रेसिडेंशियल हायस्कुल समोरील ठ युनिक्स आर्टस या दुकानासमोर किसन शंकर वाघमोडे आणि परशुराम रायप्पा मोरे व त्यांचे ईतर सहकारी यांच्यात किरकोळ कारणावरून काल शनिवारी (दि.७ ) रात्री साडेआठ - साडे नऊच्या दरम्यान तुंबळ हाणामारी झाली. त्यात किसन वाघमोडे व परशुराम मोरे हे दोघेही गंभीर जखमी झाल्याने त्यांना रात्रीच तातडीने अहिल्यानगरला जिल्हा सरकारी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले होते. मात्र दाखल होण्यापूर्वीच किसन वाघमोडे (वय ५०) याचे निधन झाले असून परशुराम मोरेवर उपचार चालू आहेत. वाघमोडे याचे शव विच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून शेवगाव पोलिसात रविवारी रात्री उशीरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम चालू होते. वाघमोडे आणि मोरे यांची चंदनवाले म्हणून परिसरात ओळख असून हाणामारीचे निश्चीत कारण समजू शकले नाही.

## मोटारीचा शॉक लागून महिलेचा मृत्यू



**पोहेगांव :** कोपरगाव शहरातील लक्ष्मीनगर परिसरात एक दुर्दैवी घटना घडली असून, घरी पाणी भरत असतांना इलेक्ट्रिक मोटारीचा शॉक लागून एका महिलेचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.मृत महिलेचे नाव ज्योती प्रकाश त्रिभुवन (वय अंदाजे ५० वर्षे, रा. लक्ष्मीनगर, कोपरगाव) असे आहे.

## श्रीरामपुरात वकिलाला कट्टा लावून मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

**श्रीरामपूर :** जागेच्या खटल्यामध्ये पत्नीच्या मामाला मदत करतो असा समज करून वकीलाला शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने मारहाण करत जखमी केले. तसेच मानेला बंदूक लावून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील सूतगिरणी रोडवर राहत असलेले ड. संजय तुकाराम कोते यांच्या शेजारी त्यांच्या पत्नीचे मामा बबनराव घोरपडे यांची जागा असून त्यांचे व शेजारी राहणारे मयुर विजय काळे, विजय यशवंत काळे (दोघे रा.सुतगिरणी रोड श्रीरामपूर) यांच्यात जागेबाबत कोर्टात खटला चालू आहे. यामध्ये संजय कोते घोरपडे यांना मदत करत असल्याचा समज, करून आरोपी काळे संजय कोते येता-जाता रागाने पहायचा. दोन दिवसांपूर्वी संजय कोते हे संगमनेररोडवर कटींग करून बाहेर आले असता तेथे मयूर विजय काळे हा कोते यांच्याकडे आला व म्हणाला की, कोते पाटील जागेचे मिटवायचे आहे की नाही? तेव्हा ड. कोते यांनी सांगितले की त्या जागेशी व वादाशी माझा काही संबंध नाही. असे म्हणताच मयूर काळे यांनी शिवीगाळ केली व ड. कोते यांच्या कानशिलात चापटी मारल्या तसेच गळा दाबून त्याच्याकडील कंबरेला असलेला गावठी कट्टा लावून डोक्याला लावून मी एक खून केला आहे, दुसरा करायला वेळ लागणार नाही, असे म्हणत विजय काळे याने लाकडी दांडक्याने मारहाण केली. तेव्हा आरडाओरडा ऐकून त्या ठिकाणच्या लोकांनी मध्यस्थी केली तेव्हा लाकडी दांड्याने मारहाण करत आरोपी तेथून निघून गेले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात ड. संजय तुकाराम कोते यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी मयुर काळे आणि विजय काळे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# अहिल्यानगरमध्ये भाडोत्री घरामधील 'पार्टी संस्कृती'चे पेव!

## अर्ध्या रात्रीच्या धांगडधिंग्याला नागरिक वैतागले; पोलिसांकडून कारवाईची अपेक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** स्थानिक गुन्हे शाखेकडून जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांवर धडक कारवाईचे सत्र सुरू झाले असून, या कारवाईचे सर्व स्तरातून स्वागत आणि कौतुक होत आहे. जुगार अड्डे, अवैध दारू विक्री, मटका, ऑनलाईन सट्टा, गांजा विक्री अशा विविध गैरप्रकारांवर पोलिसांनी छापे टाकत कारवाई केल्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला चाप बसण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, या अवैध व्यवसायांबरोबरच शहर आणि ग्रामीण भागात वाढत चाललेल्या भाडोत्री घरांतील 'पार्टी संस्कृती'वरही पोलिस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

अहिल्यानगर शहरासह सुपे परिसर व जिल्ह्यातील विविध औद्योगिक वसाहतींमध्ये नोकरीनिमित्त आलेल्या अनेक युवक-युवतींनी शहरात व केडगाव परिसरात घरे भाडे तत्त्वावर घेतली आहेत. काही जण कुटुंबासह राहत असले तरी मोठ्या प्रमाणावर तरुण वर्ग एकट्याने किंवा मित्रांसह राहतो. या ठिकाणी मित्रमंडळींना बोलावून रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात पार्ट्यांचे आयोजन केले जात असल्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. या पार्ट्यांमध्ये मद्यपान, मोठ्या आवाजात संगीत, गोंगाट, आरडाओरड यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या पार्ट्यांमुळे वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गाच्या शांततेवर परिणाम होत आहे. अनेक ठिकाणी शेजाऱ्यांकडून तक्रारी करूनही संबंधित मंडळींकडून उडवा-उडवीची उत्तरे दिली जात असल्याने संताप व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, काही ठिकाणी घर भाड्याने देताना मालकांकडून योग्य पडताळणी न केल्यामुळे अशा प्रकारांना खतपाणी मिळत असल्याची चर्चा आहे. पोलिस व्हेरिफिकेशन न करता भाडेकरू ठेवले जात असल्याने, काही ठिकाणी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेने अवैध व्यवसायांविरोधात उघडलेली मोहिम ही कौतुकास्पद असून, याच धर्तीवर रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या पार्टी संस्कृतीवरही धडक कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक आणि गृहसंस्था पदाधिकाऱ्यांकडून होत आहे. शहरासह ग्रामीण भागात रात्री गस्त वाढवून, संशयास्पद ठिकाणी छापे टाकावेत, तसेच भाडेघरांमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर पार्टींवर कारवाई करावी, अशी मागणी पुढे येत आहे.शांतता, सुरक्षितता आणि सामाजिक सुव्यवस्था राखणे हे पोलिस प्रशासनाचे कर्तव्य आहे.

अवैध व्यवसायांप्रमाणेच पार्टी संस्कृतीमुळे निर्माण होणारे त्रासदायक प्रकारही गांभीर्याने घेतले जावेत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. याबाबत पोलिस प्रशासनाकडून ठोस भूमिका घेतली गेल्यास, शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

अवैध धंद्यांवर सुरू असलेल्या कारवाईला नागरिकांचा पाठिंबा असून, भाडेघरांतील बेकायदेशीर पार्टींवरही कारवाईचे धोरण राबवावे, अशीच एकमुखी मागणी आता जिल्हाभरातून होत आहे.चौकटभाडेकरू दोन मुक्कामाला चारघरभाडेतत्वावर घेणारे दोनजण किंवा तीन जण असतात. मात्र आठवड्यातून तीन ते चार दिवस घरात मात्र चार ते सहा जण राहिलेले दिसून येतात. यावरूनच शहरातील अनेक घरांमध्ये भाडेकरू रात्रीच्या पार्ट्या करीत असल्याचे स्पष्ट होत आहे.

शेजारील वाद नको म्हणून नागरीक तक्रारी करीत नाहीत. मात्र रात्रीच्या पार्टींची संस्कृती सध्या वाढत चालली आहे. याला लगाम लागावा, अशीच मागणी होत आहे.